



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






✻ वर्ष ६५ वे ✻ अंक ७० ✻ नांदेड ✻ रविवार, दि. १५ मार्च २०२६ ✻ पृष्ठे ६ ✻ किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# धक्कादायक: शिपायाकडून पोलीस भरतीच्या प्रश्नपत्रिकेसाठी दहा लाखांची मागणी

## पोलीस अधीक्षकांकडून शिपायाचे निलंबन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात होत असलेल्या पोलीस भरतीतील लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस मुख्यालयातील एका पोलीस शिपायाने चक्क १० लाख रूपयांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस मुख्यालयातील नागनाथ माधव नागरगोजे या पोलीस शिपायास तात्काळ निलंबन केल्याचे समजते.

सध्या पोलीस भरती सुरू असून या पोलीस भरतीतील लेखी परीक्षा रविवार, दि. १५ मार्च रोजी होणार आहे. या लेखी परीक्षेतील प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देऊ असे सांगत पोलीस मुख्यालयातील नागनाथ माधव नागरगोजे या पोलीस शिपायाने काही उमेदवारांकडून चक्क १० लाख रूपयांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार उघडकीस येताच जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या संपूर्ण प्रकरणी सविस्तर माहिती घेऊन नागनाथ नागरगोजे या पोलीस शिपायावर निलंबनाची कारवाई केल्याचे समजते.



अत्यंत पारदर्शकपणे आणि कडक पोलीस बंदोबस्तात पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू असताना हा धक्कादायक प्रकार घडल्याने सारेच अचंबित झाले आहेत.

# भोकर तालुक्यातील नामांकित श्री शाहू महाराज विद्यालयातील ७ शिक्षकांचे निलंबन

## सामुहिक कॉपीप्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांचा मोठी कारवाई

**भोकर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात मोठे नाव असलेल्या आणि एक नामांकित संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री शाहू महाराज हायस्कूलमध्ये दहावीच्या परीक्षेत सामुहिक कॉपीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नांदेड यांनी केंद्रसंचालकांसह ७ कर्मचाऱ्यांना सेवेतून तातडीने निलंबित करण्याचे पत्र सदरील संस्थेस दिले आहे. या धडक कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

दि.११ मार्च २०२६ रोजी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेचा विज्ञान आणि तंत्रज्ञान–१ विषयाचा पेपर होता. तालुक्यातील या अग्रगण्य आणि नामांकित विद्यालयातील परीक्षा केंद्रावर (केंद्र क्र. ५०७३) माध्यमिक शिक्षण विभागाच्या भरारी पथकाने आणि स्वतः शिक्षणाधिकाऱ्यांनी अचानक भेट दिली. यावेळी हॉल क्रमांक १३ मध्ये एका परीक्षार्थ्याकडे कॉपीचे साहित्य आढळून आले. केंद्रावरील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना व्यवस्थित तपासून न सोडल्यामुळे आणि पर्यवेक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे हा गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आले.

पत्रात (जावक क्र. जिपना/शिअमा/मा–९/कॅम्प/१३५) स्पष्ट नमूद केले आहे की, शासनाचे 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबवणे आवश्यक असतानाही, नामांकित शाळेतील कर्मचाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. महाराष्ट्र खासगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ नुसार या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची प्रशासकीय कारवाई करून तसा अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश शाळा व्यवस्थापनाला देण्यात आले आहेत.

**या ७ कर्मचाऱ्यांवर पडली निलंबनाची कुऱ्हाड**

किनेवाड के. एन. (केंद्रसंचालक), गोडगे एस. जी. (पर्यवेक्षक), वटाणे (पर्यवेक्षक), बिडवई एस. आर. (तपासणी कर्मचारी/पर्यवेक्षक), लांबकानीकर एम. एम. (तपासणी कर्मचारी/पर्यवेक्षक), शेख सलीम (तपासणी कर्मचारी/पर्यवेक्षक), धूपे एस. एस. (तपासणी कर्मचारी/पर्यवेक्षक) सदरील संस्थेतील या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे.

जिल्हा दक्षता समितीने वारंवार आवाहन करूनही परीक्षा केंद्रावर शिस्त पाळली जात नसल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. 'परीक्षेची विश्वासार्हता जपली पाहिजे, गैरप्रकाराला खतपाणी घालणाऱ्यांची गय केली जाणार नाही,' असा कडक इशारा शिक्षण विभागाने दिला आहे. या प्रकरणाची प्रत जिल्हाधिकारी नांदेड आणि विभागीय अध्यक्ष लातूर यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आली आहे.

सर्वत्र कॉपीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असताना भोकर तालुक्यातील नामांकित विद्यालयात असा प्रकार घडल्याने शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळा व्यवस्थापनाला काढलेल्या पत्राच्या अनुषंगाने विद्यालयाची प्रतिष्ठा जपण्यासाठी शाळा व्यवस्थापन संबंधित कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करेल याकडे सबंध जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. तर तालुक्यात नामांकित असलेल्या या शाळेत असा प्रकार घडत असेल आणि शिक्षकांवर निलंबनाची कारवाई होत असेल इतर शाळांमध्ये काय स्थिती असेल अशी कुजबुज होत आहे.

# मर्यादीत तेलवाहू जहानांना परवानगी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जागतिक व्यापाराची जीवनवाहिनी मानली जाणारी 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' सध्या जगातील सर्वात धोकादायक ठिकाण बनली आहे. या सागरी मार्गावर इराणने आपले नियंत्रण घट्ट केले असून, अमेरिकेच्या वाढत्या लष्करी हालचालींमुळे येथे कधीही मोठा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणने अधिकृतपणे हा मार्ग पूर्णपणे बंद केला नसला तरी, त्यांनी एक 'नवी चाल' खेळली आहे. इराण केवळ त्यांच्या अटी मान्य करणाऱ्या आणि मित्रराष्ट्रांच्या जहाजांनाच या मार्गातून जाण्याची परवानगी देत आहे. दरम्यान, संपूर्ण जग ऊर्जा संकटाने 'गॅस'वर आलं असतानाच भारताने आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर मोठा विजय मिळवल्याचे बोलले जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने इराणसोबत केलेल्या यशस्वी चर्चेनंतर, भारतीय ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना सुरक्षित मार्ग देण्यात आल्याचा दावा केला जात आहे.

# पोलीस भरती लेखी परीक्षेकरीता कडक बंदोबस्त

## अनुचित प्रकार आढळून आल्यास कठोर कारवाई –एसपी अबिनाश कुमार

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस भरतीची मैदानी चाचणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आज दि. १५ मार्च रोजी लेखी परीक्षा होणार आहे. या परीक्षेकरीता कडक बंदोबस्त लावण्यात आला असून कुठेही अनुचित प्रकार आढळून आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

जिल्हा पोलीस दलातर्फे सन २०२४–२०२५ मधील १९९ रिक्त पोलीस शिपाई पदांच्या भरतीची मैदानी चाचणी प्रक्रिया दि. ११ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारीपर्यंत पार पडली होती. सदर मैदानी चाचणीमध्ये लेखी परिक्षेकरीता २५५४ पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, दि. १५ मार्च रोजी सकाळी ११ ते १२.३० वाजेपर्यंत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी या परीक्षा केंद्रावर होणार आहे. सदर लेखी परीक्षा ११ वाजता सुरू होणार असून उमेदवारांनी सकाळी ८ वाजता परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

लेखी परीक्षेकरिता विशेष पोलीस बंदोबस्त नेमुण परीक्षा शांततेत, व्यवस्थीतरीत्या व पारदर्शक पार पाडण्याचे दृष्टीकोणातून विविध उपाय योजना करण्यात आल्या आहेत. बंदोबस्तकरीता २ अपर पोलीस अधीक्षक, १० उपविभागीय पोलीस अधिकारी, ३२ पोलीस निरीक्षक, ४१ सहायक पोलीस निरीक्षक, ७३ पोउपनी, पुरुष व महिला पोलीस अंमलदार २९८ असा कडेकोट बंदोबस्त नेमण्यात आला आहे. परिक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची निगराणी राहणार आहे. प्रत्येक वर्गात कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. परीक्षा केंद्रावर बायोमॅट्रिक तापसणी, हजेरी पट असुन व्यक्तिशः तपासणी करीता एमएचएमडी, डीएफएमडीचा वापर केला जाणार आहे. सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार, लिपीक वर्गीय अधिकारी, कर्मचारी, पोलीस भरती प्रक्रियेच्यावेळी कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही याची दक्षता घेतील अशा सूचना देखील पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

# खा. आष्टीकर यांच्याकडून बायपासवर वाहतूक पोलिसांची कानउघडणी



**हदगाव (प्रतिनिधी)–** हदगाव–उमरखेड बायपास रोडवर वाहनधारकांना वारंवार आडवून त्रास दिला जात जात असून त्यांच्याकडून विनाकारण चालन काढले जात असल्याच्या तक्रारी वाढल्यानंतर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट घटनास्थळी जाऊन वाहतूक पोलिसांना जाब विचारला आहे. यावेळी त्यांनी नागरिकांना अनावश्यक त्रास देऊ नये, तसेच वाहतूक तपासणी नियमांनुसारच करावी, असे स्पष्ट निर्देश दिले.


मागील काही दिवसांपासून उमरखेड बायपास रोडवर वाहतूक पोलिसांकडून वारंवार वाहनांची तपासणी केली जात असल्याने अनेक वाहनधारक त्रस्त झाले होते. विशेषतः दुचाकीस्वार व लहान वाहनधारकांकडून या बाबत नाराजी व्यक्त करण्यात येत होती. काही वाहनधारकांनी या संदर्भात खासदारांकडे थेट तक्रार केली होती.

तक्रारींची दखल घेत खासदार आष्टीकर यांनी बायपास रोडवर भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित वाहतूक पोलिसांशी चर्चा करत नागरिकांना विनाकारण आडवू नका, अन्यथा योग्य होणार नाही, असा इशारा दिला. तसेच या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही आवश्यक सूचना करण्यात आल्या.

या घटनेनंतर उपस्थित वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले. वाहतूक नियंत्रण करताना नियमांचे पालन करणे गरजेचे असले तरी वाहन चालकांना अनावश्यक त्रास होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा यावेळी वाहनधारकांनी व्यक्त केली.

# पीएम मोदींच्या रॅलीपूर्वी बंगालमध्ये भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांत तुफान दगडफेक

**कोलकाता (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे पंतप्रधान मोदींच्या रॅलीपूर्वी भाजप आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. गिरीश पार्क परिसरात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. पोलिसांनी गर्दी पांगवली. पश्चिम बंगालच्या उद्योग, वाणिज्य आणि उद्योग मंत्री शशी पंजा यांनी आरोप केला की या हाणामारीदरम्यान त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. 'भाजप गुंड नाही, तो खुनी आहे. शशी पंजा यांचं याच परिसरात घर आहे. दरम्यान, कोलकाता येथे भाषण करताना पंतप्रधान म्हणाले की 'जंगल राज' ची उलटी गिनती सुरू झाली आहे. या निर्दयी सरकारचा अंत जवळ आला आहे.' पंतप्रधान मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी कोलकात्याच्या ब्रिगेड परेड ग्राउंडवर १८ हजार ६८० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. भाजप नेते आणि पश्चिम बंगालचे राज्यपाल आर.एन. रवी त्यांच्यासोबत व्यासपीठावर उपस्थित होते.









# जिथं सुख नाही तिथं राहाचं नाही...

वऱ्हाडी कथा

बंबईले मुंबा देवीच्या नावावरून नाव पळल. मंबई, मुंबई, बंबई, बॉम्बे, मुमई अशा बऱ्याच नावानं तीले ओयखलं जाते. जीवाची मुंबई करनं ह्या वाक्याचा अर्थ तवा कयला जवा मी बंबईत दाखल झालो. अथुल्ल जगनं म्हनजे डोंबाऱ्याच्या तारेवरली कसरत. धकाधकीचं जगनं, लोकलचा प्रवास, ऊल्श्या जागेत राह्यनं, ऊभं राहून खानं, हरेक गोष्टीले रांग. मंग थे हागाची, मुताची, हटेलाची, लोकल टिकिटाची असो वा काहाची.

सपनो का शहर. अस् सुध्दा हिले म्हटल्या जाते. भारताची आर्थिक राजधानी. सात बेटाच शहर. इथ जगन लय कठीन हाय. इथ सेटल होनं मुश्किल हाय. इथ आल्यावर काही मंडयी सोताले इसरून जातात. सुसाट वाऱ्यासारखे वाह्यतात. भटकलेल्या वासरासारखं.

भीमा अन् बानूबाई मुंबईत दाखल झाले. तेयच लगन गावात पार पळल अन् आठ रोजानं जोळप मुंबईत दाखल झालं. भिमाच गाव अकोला जिल्ह्य़ातील सोनगाव. अन् ह्याच गावाच्या शेजी असलेलं धनगरवाळीतली बानू. लगन थाटामाटात पार पळलं. ईदर्भ ईसपेरसन थे जनरल बोगीत बसून मुंबईत आले. भिमा हा गिरणी कामगार होता. त्यानं गोवंडी ऊपनगरात खोली भाळ्यानं घेवूनं सन्सारासाठी लागनारं जुजबी स्मायनं घरात आनून ठुयलं होतं. बानूबाईनं टेरेन न कवाच परवास केला नसल्यान थे रातभर एका जागी बसून अकळली होती. दादर सारख्या भयानक गरदीच्या ठिकानी थे दोघ ऊतरले. मानसायची किळ्यामुंग्यासारखी गरदी पाहून बानू जरा भांबावली, भेदरली. भीमानं एका हातात कपळ्याचा झोरा धरला तर दुसऱ्या हातानं बानूचा हात धरला. ना कोनी ओयखीच ना पायखीचं. निऱ्हा लोकायची धावपय. डबेवाले, चाकरमानी, ऑफिसर, बिझनेस मॅन, गिरणी कामगार, नोकर सारे धावत पयत होते. दोघ दादरले ऊतरून लोकल ठेसनावर आले. लोकलनं दादर पार करत लोकल माटुंग्याले आली मंग माटुंगा पार करत कुर्लाकळे चालली. बानूबाई लोकलच्या बंदिस्त खिडकीतून बाहेर पाह्यत होती. ऊच्ची ऊच्ची ईमारती. लोकलच्या बाजूनं असलेली ऊली ऊली अरध्या अरध्या गुंठ्यातली हिरवी वावरं पाह्यत होती. कुठ पालक, लाल माठ, मेथी, अंबाळी धावत्या लोकलच्या वाऱ्यावर डोलत होती. मुंबई हे महाराष्ट्रतलाच एक जिल्ह्या पन बानूबाईले अस वाटे की थे शांत गाव, गुराढोराच, ओयखीपायखीच गाव सोळून कोन्यातरी येगळ्याच जगात आली अस तीले घळीघळी वाटत होतं. सायन ले कोनी धारावी तर कोनी शिव म्हनते अथीस दक्षिण भारतीय लोकायची लय संख्या हाय. सायन पार करत लोकल कुर्लात येवून थांबली. आता अथिसा दोघ ऊतरनार होते. कुर्ला ठेसनावरची गर्दी पाहूनं बानूबाई थबकली. लोक लोकायले खाली ऊतरू न देता लोकलमंदी चळाले लागले. भीमान बानूचा हात घट्ट पकळला अन् लोकायले खांद्यानं ठोसे देत थे खाली ऊतरले. लोकल भरकन झुऽऽऽ झुऽऽऽ करत पुळे विद्याविहारच्या दिशेन लगेच निघून गेली. कुरल्याच्या फलाटावर तोबा गर्दी होती. लोकं पिसायल्या सारखे दादरा चळून पयत होते. ज्याले थ्याले कामावर जा ची घाई होती. बानूबाई थे सार पाहून घायबरली होती. फलाट आठवर थे आले. तथून बोरीबंदर वरून निगनारी अन वाशीले जाणारी लोकलं दोघायनं पकळली. कुर्ला, टिळक नगर, चेंबूर पार करत लोकल गोवंडीत आली. गोवंडीले थे दोघ ऊतरले. तथून पायी पायी शिवाजी नगरातल्या अहिल्याबाई होळकर नगरात आले. दाटलोकवस्तीतल्या झोपडपट्टीत थे दोघ एका बेपटीत आले. झोपळीले कुलूप होतं. भिमान कुलूप खोल्ल. खोलीत अंधारभुळूक होता. बानूबाईले वारंवार वाटे आपन कोनत्या तरी येगळ्याच जगात आलो. ना कोनी ओयखीच ना पायखीच. फकस्त लोकायची गर्दी. थे ऊल्शी खोली पाहून लळाले लागली. गावात बापाच मोठ घर, मोठ आंगन, सख्यासोबतीनी, मायची मया, बापाचा आधार थे सार सार तीले परक झाल होतं. भिमान बानूबाईले म्हतलं. बर पटकन दोन भाकरी टाक अन दे शिदोरी बांधून मी निंघतो गिरणीत.

बर न्याहारीले काय करू. मी बात दोन वळापाव आनतो. खावून घेवू. खोली आठ बाय दहाची, घरातच मोरी, घरापुळून गेलेला नाला, अरूंद गल्ली, दिवसाही अंधार, संडासाले बाहेर सार्वजनिक संडास हे सार पाहून बानूबाई लळाले लागली. तीच्या लळन्याचा अवाज आयकून शेजारच्या खोलीतलं एक चार वरषाच पोरग दाराजौळ येवून टुकमूक पाहाले लागलं. का रडतेस काकी. असे त्याचे बोल आयकून तिले बरं वाटलं. थे पोरगं घरात येवूनं वाकयीवर खेळाले लागलं. बानूबाई सैपाकाले भिळ्ळी तीनं चुलीवर सैपाक केलेला असते तीले ईस्टो पेटवता येत नाही. शेजारच्या धनवंती बाईले बानूनं ईचारून ईस्टो पेटवून घेतला. भाकरी थापाले बसली. भिमा वडापाव घेवून आला. दोघायन वळापाव खाल्ला अन् भिमा गिरणीत निघून गेला. बानूबाईचा दिवसभर घरात जीव कासावीस होत




राहे. तीले करमे ना. थे भीमाले मुंबई सोळून गावाकडे चालन्याबद्दल तगादा लाव्ये. पन थो तीले समजावून सांगे. अव बानू आपून काय अथीसा आयुष्यभर थोळी राह्यनार. पैसा अदला कमवू अन् गावाकळे घरदार बांधू अन् निंघून जावू. तीची समजूत काहाळल्यावर तीले बरं वाटे. ईतवारी भिमाले सुट्टी असल्यावर थो बानूले सिनेमा पाहाले ने बाहेर खावू घाले. पन बानूले आपल गावच बर वाटे. एका रोजी बानू बेमार पळ्ळी तीनं खानपीन सोळ्ळ. जेवली की वकारी ये. थे हल्टिंग झाली. भिमानं बानूले म्हतलं. बानू जेवत जाय न व. जेवली नाही त कस होयनं.

मले धकतच नाही राया काय करू. तोंडात घास घेतला की गीटू वाटेनासा झाला.गरगर फिरतेच. मले काय झालं कयूनच नाही राह्यलं. चल मंग आपून एक काम करू. सदायसाठी आपल्या गावाकळे जावू. मी लोकायच्या वावरात मोलमजूरी करन पन तुले रानीवानी ठुयीनं. बानू नवऱ्याच्या मिठीत शिरली अन् ढसढस् लळाले लागली. धनी माह्या मनातलं बोलले तुमी. अथी मुंबईत कोनी नाही कोनाचं. कोन्च जग हाय हे. घरदार लावलेले. जो थो आपल्याच तंद्रीत, कोनाले कोनासंग घेनदेनं नाही. आपल गाव करी थे राव ना करे. आपून गाव जवळ करू. मी ही संसारासाठी काबाडकष्ट करीनं. मले निंदन, खुरपन, कापूस येचन, सरवा येचनं, टोपनं येते. आपन सन्सार सुखाचा कर. चल मंग बानू आजच निंघू आपूनं. भिमानं सार सामायन एका पोत्यात भरलं. खोली मालकाले चाबी देवूनं हिशोब केला. बानू लयच हरकिजली होती. तीन एक वळापाव मिरची सगट खाल्ला. अन् राती बोरीबंदर वरून थे गावी जा ले निंघाले. तव्हा बानूबाई ईसपेरसच्या खिडकीतून बाहेर पाह्यत गालातल्या गालात हासत होती. बानूले आनंदीत पाहूप भिमाही आनंदीत झाला होता. भिमान मनातल्या मनात म्हतलं 'जिथ सुख नाही तिथ राहाच नाही'...

**–सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

# जगणे इथेच संपत नाही: आंतरिक दाह व जगण्याचा आशावाद पेरणारा कवितासंग्रह




चालत गेलो किती किती
रस्ता कधीच संपला नाही
सांगत होता जणू नको थांबू
जगणे इथेच संपत नाही..

'थांबला तो संपला' म्हणून अविरतपणे सकारात्मक मूल्याची जोपासना करीत जीवन जगायला हवे.दुःख, वेदना, दाह, कष्ट यातून निराशेचे मळभ दूर करून जगण्याचा दुर्दम्य आशावाद जागा करण्याचे आवाहन कवी हणमंत पडवळ करतो आहे.उस्मानाबाद जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कवी व्यवसायाने शिक्षक आहे.'जगणे इथेच संपत नाही' या कवितासंग्रहाच्या माध्यमातून आपल्या मनातील सल, भावभावना, अभिव्यक्ती, वास्तविक भीषण परिस्थिती, आत्मप्रौढी मानवी वृत्तीवर प्रखर टीका, निसर्गाचे सौंदर्य व परिणामकारकता, जगण्याची दृष्टी नि दृष्टिकोन काव्याच्या माध्यमातून मांडून काव्याची गुंफण केलेली आहे. कवी हणमंत पडवळ यांनी ग्रामीण भागातील जीवनपद्धती जवळून बघितल्याने स्वानुभव, आत्मानुभूती आपल्या लेखणीने ८१ काव्याची माळ गुंफून रचली आहे.कवी हणमंत पडवळ यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले असून निरनिराळ्या साहित्य संस्थेत कार्यरत आहे.सदर कवितासंग्रहात सामाजिक संवेदनाचा अविष्कार झाल्यानंतर वाट्यातील काट्यांना फुले समजून कार्यप्रवण व्हायला हवे. अस्मानी संकटांना न घाबरता मन खंबीर ठेऊन चाललं पाहिजे, कारण जगणे कधीच संपत नसल्याचा आशावाद कवी कवितासंग्रहातून पेरतो आहे.

'जगणे इथेच संपत नाही' हा कवितासंग्रह जन्मदात्यांना अर्पण केला आहे.वृक्षांची आधारवडमुळे कोलमडून पडल्याने झालेली अवदशा नि मानवी समूहाची झालेली ओशाळगत स्थिती अरविंद शेलार यांनी आपल्या कुंचल्यातून मुखपृष्ठावर उत्कटपणे रेखाटली आहे.महाराष्ट्राला सुपरिचित असलेले साहित्यिक योगीराज माने, लातूर यांची सुंदर अशी प्रस्तावना लाभली आहे तर डॉ.शिवाजी शिंदे सहायक कुलसचिव,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी पाठराखण केली आहे.कवी महाराष्ट्रात वाचन-लेखन चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी जीवन गौरव मासिक उस्मानाबाद जिल्ह्याचे सहसंपादक म्हणून देखील कार्यरत आहेत तसेच या पुस्तकाची मांडणी,बांधणी उत्कृष्ट असून परीस पब्लिकेशन, पुणे येथून प्रकाशित केले आहे. कवी शब्दांचा खेळ करून स्वतःच्या लेखणीचा मेळ घालून उत्तम प्रतिमा, प्रतीकांचा वापर केल्याने कविता उठावदार झालेल्या आहेत. सामाजिक जाणिवेच्या, भावनेच्या अधिकाधिक कविता या काव्यसंग्रहात दिसून येतात आणि स्वतःच्या मनाच्या गाभाऱ्यात सैरभैर करून सोडणारे द्विधा मनःस्थिती, त्याचे उत्कट भावभावना, समाजातील भीषण वास्तव स्थिती, मुखवटे धारण करून चेहरा लपविणारे मानवी वृत्ती, सुख, दुःख, वेदना, दाह, निसर्गाचे मनोभावे सौंदर्यदर्शन, बळीराज्याची दैना, शिक्षणासाठी परदेशी गेलेल्या लेकरामुळे वृद्धापकाळात जन्मदात्याची झालेली हेळसांड अश्या विविध आशयाच्या आशयगर्भित कवितेने हा कवितासंग्रह सजलेला आहे.दुःखाला मूठमाती देऊन आशेच्या शिखरावर पोहचण्यासाठी दुर्दम्य आशावाद पेरून जगणे इथेच संपत नसल्याचे भाव काव्यसंग्रहात कवीने काव्यबद्ध केले आहे. मूर्त-अमूर्त संकल्पनेला उपमा, प्रतिमा व प्रतीके वापरून कवितेतून कधी कधी सामाजिक स्थितीवर प्रहार केलेले आहे. आसवांनो, जगणं, बळ ऊर्जेचे, वावटळ, निराशा,आठवणी,आठवणीचे अवशेष या कवितेतून स्वयंप्रेरीत होऊन जगण्याचे सामर्थ्य,बळ देण्याचे कार्य कविता करते.'बळ ऊर्जेचे' या कवितेत कवी म्हणतो की,

काय करतील वादळे
उद्ध्वस्त झालेल्या मनाला
पुन्हा नव्याने सुरू केले
मी माझ्या जगण्याला...

पराजय अगोदर मनामध्ये होत असतो त्यामुळे मन घट्ट असायला हवे.मनातील मळभ, चिंता बाजूला सारून जगण्याला सार्थ ठरविण्यासाठी नव्याने प्रारंभ करायला हवा.स्त्री ही अबला नसून सबला नारी आहे. स्त्रीचे कर्तृत्व, नेतृत्व व मानवाची स्त्रीच्या संदर्भात असलेली कुजकी मानसिकतेवर कवी प्रहार करतो आहे.

**पुस्तक परीक्षण**
**दुशांत निमकर**
चंद्रपूर
मो. ९७६५५४८९४९

स्त्री म्हणून,असहाय नियती,घाव,मातृदिन या कवितेतून मांडला आहे.एखाद्याने सूडबुद्धीने वर्तन केले तरी बदल्याची भावना न ठेवता संधी म्हणून बघण्याची दृष्टी निर्माण करावी.मनकवड्या प्रमाणे माणसाच्या मनात असलेली सल 'पोरी,तू मोठी भाग्याची' या कवितेतून दिसून येते.त्यात कवी म्हणतो की,

विरून जाते आयुष्य आणि
सरून जातात आठवणी
गेल्या सरल्या क्षणाची
दाटतात उरात रडगाणी...

'कण्हत' ही कविता अल्पाक्षरी असली तरी वाचल्यानंतर सांगा कसं जगायचं? या मंगेश पाडगावकर यांच्या कवितेची आठवण आल्यावाचून राहत नाही. 'कण्हत' या कवितेतून अहंभाव,अहंकाराचा खात्मा होत असते त्यामुळे कण्हत कण्हत जगण्यापेक्षा गाणे म्हणत जगायला हवं. मन ही अदृश्य, अमूर्त प्रतिमेचा वापर करून मानवी वृत्ती, नीतीमत्ता, माणुसकी ही मन, चंचल वारा, मावळतीच्या कळा, मन नसलेलं वय, माणसे, चेहऱ्यामागचा चेहरा, मनोवलय, मृगजळ, समाजमन, वाहते उलटे वारे, आरसा, आरसा बोलू लागला या कवितेतून दिसून येते. सरड्याप्रमाणे रंग बदलविणारी माणसे, माणसाची जळकुटी वृत्ती, संगतीत सुखी पण सदा दुःखी अशी संभ्रम निर्माण करणारी स्थिती दिसून येते तेव्हा कवी 'संभ्रम' या कवितेतून व्यक्त होतांना म्हणतो की,

रडले जे माझ्या जवळी
ऐकून माझी कहाणी
अंतरी खुशीच होती त्यांच्या
मग हसले कसे तोंड फिरवूनी...

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीची झालेली दुरावस्था, बळीराजाची जगण्याची निराशा तर कधी बहरलेला हिरवागार मळा याचे यथार्थ वर्णन सौंदर्यलीलेतून मोगरा फुलला, साज ल्याली धरणी, आत्मवृत्त, हृदयपटल, झोपडी या साऱ्या कवितेतून मांडलेले आहे.'ढगांची लगीन घाई' या कवितेत म्हणतात की,

आले आले गर्जत आले
पर्जन्यराजे आले डौलाने
गंध उधळून मंद मातीचा
स्वागत केले नवरीने...

काळ बदलत चाललेला आहे.जुन्या वाईट प्रथांना टाळून चांगल्या रीती, परंपरा, चालीरीतीचे अवलंब करायला हवे. ज्या मातीत जन्माला आलेत त्या मातीशी इमान राखत सचोटीने कार्य करायला हवे असा मौलिक संदेश कवी 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' या कवितेतून मांडतांना म्हणतात की,

शेतीभाती जपतो मातीशी नाती
खेड्यात त्याचा एक वाडा जुना
सुटली जरी आशा साऱ्याकडूनी
तो जपतोय संस्कृतीच्या पाऊलखुणा...

पैसा हा जगण्यासाठी लागत नसून व्यवहारासाठी उपयोगी असतो पण स्वार्थी वृत्ती बळावून भ्रष्टाचाराचे पेव फुटलेले आहेत यावर मार्मिकतेने कवीने बोट ठेवले आहे. कुठं हरवली?, गुदमरलेला जीव, दोन रंग आयुष्याचे, कोण आहे माझं,जखमा आणि वेदना, अवहेलना, नदी किनारी, अजब-गजब या साऱ्या कवितेतून घाव आणि धाव अशी आर्जव विनंती समाजभान राखणाऱ्या लोकांना केली आहे.श्रीमंतीचा आव न आणता झोपडीत देखील समाधान असते.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'या झोपडीत माझ्या' राजाला महालात न मिळणारी समृद्धी झोपडीत प्राप्त झाली अशाच आशयाची 'झोपडी' या कवितेतून कवी व्यक्त होतांना म्हणतो की,

कष्टात गेला जनम आमुचा
नाही बांधला इमला-जुमला
भुईवरती निजणे आमुचे
झोपडीत असे बंगला....

'रोज मरे त्याला कोण रडे??' ही ग्रामीण भागातील म्हण अवहेलना या अल्पाक्षरीला चपखल बसणारी आहे.विस्मरणात गेलेल्या बाबीचे स्मरण करणारी बाब तसेच देशभक्ती,राष्ट्रप्रेम जागविणाऱ्या सैनिकांच्या बाबतीत मनोबल वाढविणारी प्रार्थना,वेश्यावृत्तीची कैफियत मांडणारी रंगमहाल ही कविता,मैत्रीतून कृतज्ञता व्यक्त करणारे भाव अश्या विविधांगी आशय घेऊन समृद्धतेचा झरा व जगण्याचा आशावाद कवितेतून तेवत ठेवलेला आहे.'रणांगण' या कवितेतून आपले अभिप्राय मांडतांना कवी म्हणतो की,

विकृतांच्या विळख्यात जरी
मी रणांगण सोडणार नाही
होऊ द्या प्रहार,करा कहर
लढाई अर्ध्यावर सोडणार नाही...

काल, आज आणि उद्याचा उषाकाल सारखाच आहे त्यामुळे भुतकाळाचा आधार घेत वर्तमानाशी मेळ घालून भविष्याचा वेध घ्यायला हवा असा आशावाद 'कोण आहे माझं?' या कवितेत आहे तर रंगात एकमेळ न होता समता नि एकतेचे रणशिंग फुकण्याचे आवाहन कवी करतांना म्हणतात की,

सारूनी मळभ सारे मनावरचे
एकतेची मूठ आवळली पाहिजे
विसरून ते रंग सारे आता
तिरंग्याची तळमळ ओळखली पाहिजे..

अश्या प्रकारच्या जगण्यातील विविधता,भोवतालची सामाजिक स्थिती, मानवाचे वर्तन ध्यानात घेऊन विविधरंगी आशयाच्या रचना 'जगणे इथेच संपत नाही' या कवितासंग्रहात आलेल्या आहेत.आंतरिक मनातील दाह व जगण्यातला आशावाद काव्यपुष्यातून पेरलेला आहे.कवितेतील आशावाद वाचकांना व समाजमनाला जगण्याची उम्मीद निर्माण करणारा आहे.कवींची शब्दावरील पकड मजबूत असल्याने सर्व कविता वाचनीय आहेत.अशाच प्रकारच्या आणखी साहित्यकृती कविकडून घडावी हीच सदिच्छा!!!!

**कवितासंग्रहाचे नाव:**
**जगणे इथेच संपत नाही**
**कवींचे नाव : हनुमंत पडवळ**
**प्रकाशक :परीस पब्लिकेशन, पुणे**
**मुखपृष्ठ : अरविंद शेलार**

# संघर्षयोध्दा : नगरसेवक संजय पाटील घोगरे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील वाघाळा येथील शिवाजीराव पाटील घोगरे यांच्या कुटुंबात १५ मार्च १९८४ रोजी संजय पाटील घोगरे यांचा जन्म झाला. वडील पूर्वीपासूनच सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय व त्यातल्या त्यात घोगरे परिवार पंचक्रोशीत नावारूपाला आला आहे.

संजय पाटील घोगरे यांचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सिडको भागातील महाविद्यालयात झाले. क्रीडा क्षेत्रातील आवड असल्याने विविध खेळांच्या माध्यमातून शालेय जीवनातच नावलौकिक मिळविला. तसेच स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून भाषणाची आवड व विविध वक्तृत्व स्पर्धेमध्ये त्यांचा सहभाग असायचा.

प्रारंभी तरुण वयात युवाशक्ती मित्र मंडळाच्या सहाय्याने पंचक्रोशीतील अनेक गावात गणेशोत्सव, नवरात्र महोत्सव, गोकुळाष्टमीसह सण, उत्सव काळात युवकांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रमांचे आयोजन तर युवा शक्ती मित्र मंडळाच्या वतीने भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्ताने रक्तदान शिबीर, गोकुळ अष्टमी निमित्ताने दहीहंडी, तर नवरात्र उत्सव निमित्ताने दांडीयाचे आयोजन करून भाविक-भक्तांसह नागरिक, युवक व महिलांना सण, उत्सव काळात एकत्र आणण्याचे काम करून सण, उत्सव सिडको-हडको परिसरात मोठ्या उत्साहाने साजरे केले.

मनपाच्या निवडणुकीत आई इंदुबाई शिवाजीराव पाटील घोगरे ह्या राष्ट्रवादी



पक्षाच्या वतीने माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्या. नंतर झालेल्या निवडणुकीत भाजपाच्या वतीने पुनश्च मातोश्री इंदुबाई घोगरे ह्या निवडून आल्या. घोगरे परिवार यांनी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन मतदारांनी विजयी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्ताने २६ जानेवारी रोजी युवाशक्ती मित्र मंडळाच्या वतीने सिडको परिसरातील रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना रक्तदान देऊन अनेक अपघातग्रस्त रुग्णांना जीवदान तर कोरोना काळात परिसरातील नागरिकांना अन्नधान्य वाटप व वृत्तपत्र विक्रेते बांधवांना अन्नधान्य किट पुरवठा करून सामाजिक बांधिलकी जोपासत कार्य केले आहे. सिडको, हडको परिसरासह ग्रामीण भागातील अनेक गावातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसह सर्वच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधीलकी जोपासली.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघ निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून संजय पाटील घोगरे यांनी उमेदवारी दाखल करून राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह निवडणूक रिंगणात उडी घेतली. या काळात प्रचार सभा, बैठका, निवडणूक रणनितीमुळे आघाडी घेतली होती, म्हणूनच त्यांना निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली.

तब्बल आठ वर्षांनंतर झालेल्या मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली खा. अजितराव गोपछडे, भाजपा शहर महानगरध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व दक्षिण विधानसभा मतदारसंघातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा एकजुटीने सर्वात मोठा असलेला प्रभाग क्रमांक २० मधून पाचही जागेवर एकतर्फी विजय मिळवून आणला. त्या निवडणुकीत संजय पाटील घोगरे सर्वसाधारण मतदारसंघातून विजयी झाले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून मनपाच्या निधीतून व खासदार, आमदार आणि मनपाच्या निधीच्या माध्यमातून सिमेंट काँक्रीट रस्ते, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या व विविध योजनेतून प्रभागातील विकासासाठी कटिबद्ध असलेल्या व हजारो अपघातातील संबंधित आजारी रुग्णांना जीवदान देणाऱ्या व लाखो गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या या संघर्ष योध्दा युवा नेते संजय पाटील घोगरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा व भावी कार्यास सदिच्छा.

**–रमेश ठाकूर**
सिडको.

# नाशिक कुंभमेळ्यासाठी २२,१८१ कोटी रुपयांच्या कामांना मान्यता

**नाशिक(प्रतिनिधी)**–नाशिक मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन २०२७ मध्ये करण्यात येत असून या कुंभमेळ्यात देश - विदेशातून करोडो भाविक येणार आहेत. कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताची पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्र्यंबक-नाशिक सिंहस्थ कुंभमेळाकरिता करण्यात येत असलेल्या विविध कामांसाठी २२ हजार १८१ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात आयोजित कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ५ हजार १४० कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातील १७ हजार ४१ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. कुंभमेळा निमित्त सुरू असलेली आणि प्रस्तावित असलेल्या कामांमध्ये कुणी वाईट हेतूने किंवा मुद्दाम विलंब होण्याच्या हेतूने अडथळा आणत असेल, तर त्याची गय केली जाणार नाही. त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुंभमेळा निमित्ताने करण्यात येणाऱ्या कामांकरिता लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. नाशिक वर्तुळ मार्गातील अडथळे दूर करीत विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी.

कुंभमध्ये स्वच्छता अत्यंत महत्वाची असून या कामांमध्ये करण्यात येणारी शौचालय दर्जेदार असावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या परिसरातील स्थानकांची पायाभूत सुविधांची कामे रेल्वेच्या माध्यमातून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निफाड रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात यावा, याबाबत रेल्वेने पडताळणी करून कार्यवाही करावी.

# अटळ मरणे...

छळ करणारे । छळल्या जातील ।
दुःख भोगतील । जन्मभर ।।
पेरसाल तेच । नक्की उगवेल ।
संकट टळेल । सुकर्माने ।।
सांगून गेलेत । इथे संतजन ।
वाईट चिंतन । करू नका ।।
मरणाला सर्व । सामोरे जातील ।
राहून गाफील । जगू नका ।।
उधारीचे जिणे । अटळ मरणे ।
तोल सावरणे । तुज आहे ।।
सर्वकाही शक्य । प्रयत्न केल्याने ।
वाढते दिल्याने । ज्ञान वेड्या ।।
अशांत मनाला । शांत करण्यास ।
करा हमखास । पुण्य कर्म ।।
न्यायपूर्ण निती । चित्ती समाधान ।
मान अपमान । सम जाणा ।।
रागाच्या कारणे । सर्वकाही नष्ट ।
अजु कर कष्ट । नियमित ।।

**–अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी
ता.दारव्हा, जि. यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# शनिवारच्या दोन्ही सामन्यात विदर्भ व महाराष्ट्र क्रिकेट संघाचा विजय

## आज फायनल मॅचचा थरार रंगणार




**नांदेड (प्रतिनिधी)** – वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्र आयोजित वेस्ट झोन वेस्टन्स टी–२० क्रिकेट सामने नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे सुरू आहेत. शनिवार, दि. १४ मार्च रोजी तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात मुंबई विरूद्ध विदर्भ या दोन क्रिकेट संघात सामना होऊन विदर्भ क्रिकेट संघाने हा सामना जिंकला. तर दुपारच्या सत्रात महाराष्ट्र विरूद्ध गोवा या संघाचा सामना होऊन महाराष्ट्र या संघाने यात विजय मिळवला. रविवारी सेमी फायनल व फायनल मॅच होणार आहेत.

नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे मागील तीन दिवसांपासून क्रिकेटचे सामने होत आहेत. वरिष्ठ स्तरावरील व रणजी क्रिकेट सामन्यात खेळलेले उत्कृष्ट खेळाडू यात सहभागी आहेत. अतिशय रोमहर्षक सामने येथे खेळले जात आहेत. संपूर्ण राज्यभरातून क्रिकेट संघ येथे सहभागी झालेले आहेत. आज तिसऱ्या दिवशी मुंबई विरूद्ध विदर्भ या दोन क्रिकेट संघात सामना होऊन प्रथम विदर्भ संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यात त्यांनी २० षटकांत १५२ धावा काढल्या. ५ गडी बाद होऊन या धावा काढण्यात आल्या. या संघाकडून दीपक आचार्य ३२ चेंडूत ४२ धावा, प्रसाद सावंत १७ चेंडूत ३० धावा, राजेश आणि राजेंद्र या दोघांनी प्रत्येकी १५ धावा काढल्या. विदर्भ संघाकडून अनुप २ आणि राहुल व परीक्षित यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. विदर्भ संघाने धावांचा पाठलाग करीत निर्धारित लक्ष १८ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. यात शालाब श्रीवास्तव यांनी ४७ चेंडूत ६९ धावा केल्या व सामनावीर अनुप फुलपार यांनी ४८ चेंडूत नाबाद ६२ धावा काढून विजय संपादन केला. मुंबई संघातर्फे रविराज आणि कैलास पांडे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

दुपारच्या सत्रामध्ये ऊन असले तरी खेळाडूंमध्ये उत्साह पाहण्यास मिळाला. महाराष्ट्र विरूद्ध गोवा हा क्रिकेटचा सामना होऊन गोवा संघाने प्रथम फलंदाजी केली. निर्धारित २० षटकांत ४ बाद १८९ धावा काढल्या. यामध्ये कर्णधार साहीलने ६१ चेंडूत १०३ धावा त्यात ८ चौकार, ६ षटकार लगावले. दामोदर यांनी ३० धावा काढल्या. महाराष्ट्र क्रिकेट संघाकडून मोहन बडुरे व शेख जाहेद यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. महाराष्ट्राने १९.१ षटकात विजय मिळवला. कर्णधार अभिजीत कदम यांनी ४५ चेंडूत ७१ धावा, खालीद जमान यांनी ३२ धावा, आसिफ खान यांनी २१ चेंडूत ५४ धावा काढल्या. सामनावीर म्हणून अभिजीत कदम यांना बहुमान मिळाला. वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्राचे टीम अध्यक्ष उदयसिंह शिंदे, उपाध्यक्ष किशोरभैय्या जगताप, उपाध्यक्ष मोहन बडुरे, मॅनेजर तथा कोच महंमद फहीम व इतर पदाधिकारी यांनी संघांचे अभिनंदन करून फायनल मॅचसाठी शुभेच्छा दिल्या.

# लोहा शहरातील बॅनरमुक्तीचे दुकानदारांकडून स्वागत; व्यापाऱ्यांकडून नगराध्यक्ष व टिमचा सत्कार



**लोहा (प्रतिनिधी)** –वाट्टेल तेथे आणि वाट्टेल तेवढे दिवस दुकानाच्या समोर बॅनर लावून दुकाने झाकण्याची मनमानी सुरू होती, पण आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दुकानांसमोर बॅनर लावू नका, असे निर्देश दिले. नगराध्यक्ष शरद पवार व सहकार्यांने याची अंमलबजावणी केली आणि शहरातील नागरिक व दुकानदारांनी मोकळा श्वास घेतला. बॅनरमुळे त्रस्त झालेल्या दुकानदारांनी सुटकेचा श्वास सोडला. बारा वर्षांनंतर पहिल्यांदाच व्यापाऱ्याच्या शिष्टमंडळाने नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व सर्व नगरसेवक यांचे जाहिरपणे आभार व्यक्त करत नगराध्यक्षांचा सत्कार केला.

लोहा नगरपालिकेची सूत्रे हाती घेऊन ६५ दिवस झाले. नगराध्यक्ष शरद पवार व त्यांच्या सहकार्यांने शहर स्वच्छतेवर भर दिला. खुद्द उच्चविद्याविभूषित महिलांनी श्रमदान करत शहराच्या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. शहरात बॅनर लावण्याची प्रचंड स्पर्धा होती. खुद्द नगरपालिका कारभाऱ्याचे बॅनर दुकानाच्या समोर आठ आठ, दहा दहा दिवस राहत असत. या बॅनरबाजीमुळे शहरातील दुकानदार त्रस्त झाले होते. आ. प्रतापराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष शरद पवार व टीमला एकहाती सत्ता दिली. आ. प्रतापराव पाटील यांनी पहिल्यांच बैठकीत शहरात दुकानाच्या समोरील बॅनरबाबत सक्त ताकीद दिली. व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या, बॅनरसाठी जागा नेमून द्या, असे निर्देश दिले आणि नगराध्यक्ष शरद पवार यांनी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आणि शिवजयंती निमित्ताने शुभेच्छा फलक नको–पुस्तके द्या, असे आवाहन केले.

या नवोपक्रमाची जिल्ह्यात चर्चा झाली. पुस्तकप्रेमींनी मोठ्या प्रमाणात नगरपालिका वाचनालयास पुस्तके दिली. शहरात बॅनरमुक्तीची अंमलबजावणी पाहता दुकानदारांनी या निर्णयाचे जोरदार स्वागत केले.

या निर्णयामुळे व्यापाऱ्यांनी नगर परिषदेत जाऊन नगराध्यक्ष शरद पवार व त्यांच्या सहकार्यांचे अभिनंदन केले. यावेळी आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, सुभाष सावकार, संजय अंकुलवार, अमोल घंटे, निळू वडजे, लक्ष्मीकांत बच्चेवार, रामपातेवार, राहुल परगे, राहुल बिडवई, बालाजी कळसकर, शिवलिंग भालके, सूर्यकांत कटकमवार, रमेश कदमवार, चंद्रकांत वाळके, श्रीहरी सुपारी, हिरालाल बिंदास घंटे, संतोष मद्रेवार, नागोराव बाळे, अतुल कोटगिरे, बंडू भोसकर, दत्तू भोसकर, दीपक सावकार, रुद्रवार लक्ष्मीकांत, कदम उमेश, बेजगमवार वेंकट, सावकार कोटलवार, संजय अंकुलवार, सयाजी फुलपगार, नीलकंठ वडजे, तुकाराम सावकार, कोटलवार विजय, कुटलवार गिरधारी, सिद्धी वाले आदींची उपस्थिती होती.

# चौथ्या जनहित साहित्य संमेलनात रंगली ‘गझलसंध्या’




**नांदेड (प्रतिनिधी)** – राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे.) आयोजित चौथे राज्यस्तरीय जनहित मराठी ग्रामीण साहित्य संमेलन रविवार, दि. ८ मार्च रोजी श्री दत्तात्रय मठ संस्थान, मोहनपुरा येथे उत्साहात संपन्न झाले. संमेलनाध्यक्षा ज्येष्ठ साहित्यिका डॉ. ललिता मुकुंद बोकारे, मुख्य संयोजक भैय्यासाहेब गोडबोले व मान्यवर साहित्यिकांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी, परिसंवाद, कथाकथन, गझलसंध्या व कविसंमेलन सत्रांना रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

जागतिक महिला दिनानिमित्त महिला वर्गाला समर्पित गझलसंध्येची सुरुवात हिमायतनगर येथील पुरवठा निरीक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या युवा गझलकारा छाया नागर्थवार यांनी केली. वेलीसमान जगणे स्वीकारलेच नाही, आधार देत जाणे पण टाळलेच नाही... पाण्यावरील शांती नाही खरे कळाले, टाकून पाहिल्यावर पाण्यात दोन कंकर.... जसा जगात यायला बराच वेळ लागला, जगायचे शिकायला बराच वेळ लागला... कुणी कमी वयातही चलाख फार जाहला, मला तसे बनायला बराच वेळ लागला...अशा सुंदर शेरांनी त्यांनी रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवली व गझलसंध्येचा आगाज केला.

भिमाची बघ तिला मोठी तमा होती, समंजस त्यागमूर्ती ती रमा होती... शिवबासमान येथे उरला कुणीच नाही, दिसते हरेक महिला आईबहीण ज्याला...लाखो विवंचनांशी लढतो मराठवाडा, जोशामधे तरीही जगतो मराठवाडा... होतात आत्महत्या येथे उगाच नाही, कर्जात बाप रुतता कन्हतो मराठवाडा! अशा दमदार शेरांमधून हिमायतनगर येथील युवा पत्रकार, गझलकार विजय वाठोरे यांनी रसिकांची दाद मिळवली.

वाद जेथला तिथे सोडणे सुंदर असते, माझ्यामधले मीपण जळणे सुंदर असते... पाहून माणसाला फसतो बऱ्याचवेळा, अंदाज आरशाचा चुकतो बऱ्याचवेळा... ती सरिता निखळ तिला तर मनभरून जगता येते, मी कातळ काठावरचा मज कुठे वाहता येते? अशा सहजसुंदर शेरांच्या सुरेल तरन्नुम सादरीकरणाने गंगाखेड येथील प्रसिद्ध गझलकार डॉ. यशवंत मस्के यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

बळीराजा बुडाला खोल यंदाही, पिकाला भाव कवडीमोल यंदाही... आतल्या कोलाहलाचा शोध घेतो, रोज मी माझ्या मनाचा शोध घेतो... पाचवीला पूजलेले दुःख आहे, आणि मी वेडा सुखाचा शोध घेतो... अशा वास्तववादी आशयघन शेरांनी पुसद येथील प्रसिद्ध गझलकार सतीश देशमुख यांनी रसिकांना अंतर्मुख केले.

# ‘ऑपरेशन यात्री सुरक्षा’ आणि ‘ऑपरेशन अमानत’ अंतर्गत आरपीएफ नांदेडची उल्लेखनीय कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी रेल्वे सुरक्षा बल (RPF) नांदेड विभाग सतत सतर्कपणे कार्य करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ‘ऑपरेशन यात्री सुरक्षा’ आणि ‘ऑपरेशन अमानत’ अंतर्गत आरपीएफने चोरीचा प्रयत्न करणाऱ्या संशयिताला पकडले. तसेच प्रवाशांची हरवलेली बॅग सुरक्षितपणे परत केली.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत दि. ११ मार्च रोजी सायंकाळी नांदेड रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र. १ वर फूट ओव्हर ब्रिजजवळ CIB-DI/NED व GRP/NED चे कर्मचारी चोरी करणाऱ्या संशयितांवर लक्ष ठेवून गस्त घालत होते. यावेळी के. बालाजी (HC-२५९), एम. जी. चौहान (HC-६४६) आणि अजीत सिंह (CT-२१६६) यांनी सोनू (वय २५ वर्षे), रा. नांदेड याला प्रवाशांचे सामान चोरी करण्याचा प्रयत्न करत




असताना पकडले.

यानंतर त्याला पुढील कायदेशीर कारवाईसाठी GRP नांदेड यांच्या ताब्यात देण्यात आले असून, महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा क्र. १९/२०२६ दिनांक ११ मार्च रोजी नोंद करण्यात आला आहे. तसेच ऑपरेशन अमानत अंतर्गत Train No. १२७८७ Express मध्ये राहिलेल्या बॅगेबाबत DSCR नांदेड येथे तक्रार प्राप्त झाली. तक्रार मिळताच आरपीएफ नगरसोल येथील कॉन्स्टेबल प्रवीण कुमार (Con/२१२१) यांनी ट्रेन नगरसोल स्थानकावर आल्यानंतर S–७ कोचमध्ये शोध घेतला आणि एक तपकिरी रंगाची मिनी हँडबॅग हस्तगत केली. सदर बॅग सुरक्षितपणे आरपीएफ पोस्ट नागरसोल येथे ठेवण्यात आली. नंतर ही बॅग विजयवाडा येथील मोहम्मद जिलानी यांची असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी भीमावरम टाउन ते चेरलपल्ली प्रवास करताना चुकून ती बॅग ट्रेनमध्येच राहिली होती.

सदर बॅगमध्ये ३ हजार ६०० रोख रक्कम, अंदाजे १५ हजार किमतीचा विवो मोबाईल फोन, दोन चष्मे, एटीएम कार्ड, ओळखपत्रे व इतर वैयक्तिक कागदपत्रे असे मिळून सुमारे २१ हजार किमतीचा माल होता. प्रवाशाची ओळख आधार कार्डद्वारे पडताळून सदर बॅग त्यांना सुरक्षितपणे परत करण्यात आली. प्रवाशाने आरपीएफच्या तत्परतेबद्दल आणि प्रामाणिक सेवेसाठी मनापासून आभार व्यक्त केले.

# बिलोली येथील अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**बिलोली (प्रतिनिधी)** –शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बिलोली येथील नगर परिषदेच्या माजी उपाध्यक्ष व नगरसेवकांसह युवा कार्यकर्त्यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे.

या पक्ष प्रवेशानंतर बिलोली येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत येत्या काळात ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बिलोलीसह ग्रामीण भागात शिवसेनेचे संघटन मजबूत करून सत्ता आणणार असे प्रतिपादन बिलोली नगर परिषदेचे माजी नगरसेवक तथा युवा नेते लक्ष्मण शेट्टीवार यांनी केले.

यावेळी उपाध्यक्ष आनंद गुडमलवार, चक्रधर पाटील, देवान्ना तदरोड, सायलु शेट्टीवार, साईनाथ हागरगे, इरेश मुंडकर, शंकर केशोड, संतोष सुकलोड यांच्यासह अनेक युवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश केला. शेट्टीवार यांच्यासह बिलोली येथील कार्यकर्त्यांनी केलेल्या पक्ष प्रवेशानंतर बिलोली येथील शासकीय विश्रामगृहात शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष व्यंकटराव खतगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत पक्षप्रवेश केलेल्या लक्ष्मण शेट्टीवार यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख बाबाराव रोकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# भक्ती गणेश मंडळाचा राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** – येथील पोचम्मा गल्ली (गणेश नगर) परिसरातील श्री भक्ती गणेश मंडळ, कुंडलवाडी यांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या वतीने आयोजित महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ मध्ये नांदेड जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळाला आहे.

मंडळाच्या सामाजिक संदेश देणाऱ्या आकर्षक सजावटीची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत मिळालेल्या यशाबद्दल मंडळाला प्रमाणपत्र व रोख रक्कम ३० हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या प्रमाणपत्रावर सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे संचालक मीनल जोगळेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सायन्स कॉलेज नांदेड येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील सायन्स कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी व लेखक योगीराज माने यांनी विद्यार्थ्यांना त्यांनी स्वतः लिहिलेल्या कविता, चारोळी व ग्रंथसंपदा सादर केली. त्यांनी सादर केलेल्या कवितेचा मनमुराद आनंद महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला. त्यांनी नातवंडावरील सादर केलेली कविता सर्वांना विशेष आवडली.

वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांमध्ये सीडीसीचे अध्यक्ष दीपनाथ पत्की यांनी पहिल्या दिवसाच्या सत्रात सर्व विद्यार्थ्यांना आपल्या अंतर्गत सुप्त कलागुणांना वाव मिळण्याची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने विविध कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन योगीराज माने यांनी केले.

यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, चेस, थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक या मैदानी स्पर्धांचे आयोजन डॉ. अश्विन बोरीकर यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांमध्ये मुलींसाठी वेशभूषा, साडी स्पर्धा, मेहंदी, रांगोळी व फॅन्सी ड्रेस या स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धांचे आयोजन डॉ. प्रीता बोरकर, डॉ. विभाती कुलकर्णी, डॉ. रूपा सांगवीकर, डॉ. संगीता मोदी व डॉ. रेखा वाडेकर यांनी केले होते. यामध्ये दीडशे मुलींनी सहभाग नोंदवला. सायन्स कॉलेज नांदेडच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवी योगीराज माने यांच्या हस्ते करण्यात आले, तर नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय सदस्य प्रदीप नागापूरकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे व स्नेहसंमेलन आयोजक प्रा. प्रशांत सुतकर यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रदीप नागापूरकर यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना प्रेम कविता वाचून दाखवली व स्नेहसंमेलनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सदस्य दीपनाथ पत्की यांनी स्नेहसंमेलनास शुभेच्छा दिल्या. प्रा. विशाल मराठे, प्रा. डॉ. किरण शिल्लेवार, प्रा. माया राऊत, प्रा. अंकिता वडजे, प्रा. प्रतीक्षा सुर्वे, प्रा. चैताली काकडे यांनी विविध स्पर्धांचे परीक्षक म्हणून कार्य पाहिले, तर प्रा. शैलजा वडजे यांनी सर्व महिला व विद्यार्थिनींसाठी विविध गुणदर्शनाचे आयोजन केले. प्रा. रेखा वाडेकर यांनी कविता वाचन केले, तर प्रा. विजयीकरण नरवाडे, प्रा. सुनील कदम व प्रा. संगीता मोदी यांनी विज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा घेतली. यामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या विविध भागांवर प्रश्न विचारण्यात आले व त्यांची थोडक्यात पार्श्वभूमी सांगण्यात आली. महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य सौ. अरुणा शुक्ला व एकनाथ खिल्लारे तसेच आयोजक प्रा. प्रशांत सुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडले.

# हडको येथील रामनवमी वार्षिक उत्सव अध्यक्षपदी विनायक जोशी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – हडको येथील राम मंदिराचा नवमी वार्षिक उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विनायक दिवाकर जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

१० मार्च २०२६ रोजी श्री राम मंदिर विश्वस्त मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीस संस्थापक अध्यक्ष डॉ. उदयकुमार देविदास पाध्ये, विश्वस्त मंडळातील नारायण गुट्टे, विनायक जोशी, केरबा क्षीरसागर, बालाजी रहाटकर, प्रभाकर तम्मेवार, सी. भंडारी, सी. जोशी व परिसरातील नागरिक यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये प्रभु श्रीराम नवमी वार्षिक उत्सव २०२६ च्या बाबतीत चर्चा करण्यात आली. वार्षिक उत्सव साजरा करण्यासाठी चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे सर्वानुमते प्रभु श्रीराम नवमी वार्षिक उत्सव समितीची स्थापना करण्याचा प्रस्ताव सर्वानुमते ठेवण्यात आला. त्या प्रस्तावास अनुमोदन मल्लीकार्जुन नमोशे, गणेश पा. जाधव, शिवकिरण मुक्कनवार, पांडुरंग सिरसाठ, प्रतीक घोरबांड, मारोती कोल्हे यांनी दिले. त्या प्रस्तावाप्रमाणे रामनवमी वार्षिक उत्सव समितीचे अध्यक्ष विनायक दिवाकर जोशी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदर समितीच्या पुनर्बांधणीची संपूर्ण जबाबदारी जोशी यांना सर्वानुमते देण्यात आली असून, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत सदरील उत्सव समिती पूर्णपणे तयार करावी, असे सर्वानुमते ठरले.

# निवडणूक आयोगाकडून भोकर तालुक्यात ‘एसआयआर’ मॅपिंग प्रक्रियेला वेग

**भोकर (प्रतिनिधी)** – आयोगाच्या मार्गदर्शनाखाली सध्या भोकर तालुक्यात 'SIR' मॅपिंगची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवली जात आहे. तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील प्रत्येक मतदाराने आपले नाव या प्रक्रियेअंतर्गत ‘मॅप’ करून घेणे आवश्यक असून, प्रशासनाकडून याबाबत व्यापक जनजागृती केली जात आहे. विशेष म्हणजे, २००२ च्या मतदार यादीतील नावांचा आधार घेऊन ही पडताळणी केली जात आहे.

२०२४ च्या अद्ययावत मतदार यादीत ज्या नागरिकांची नावे आहेत, त्या नावांची पडताळणी २००२ च्या जुन्या मतदार यादीनुसार केली जात आहे. जर एखाद्या व्यक्तीचे नाव २०२४ च्या यादीत आहे आणि त्याच व्यक्तीचे नाव २००२ च्या यादीत उपलब्ध असेल, तर त्याला ‘पर्सन टू पर्सन’ म्हणून मॅप केले जाते. जर नाव एकाच गावात असेल तर संबंधित बीएलओ स्वतः हे मॅपिंग करतील. मात्र, नाव तालुक्यातील दुसऱ्या गावात असल्यास मतदाराला स्वतःहून बीएलओला माहिती द्यावी लागेल. ज्या तरुण मतदारांचा जन्म २००२ नंतर झाला आहे किंवा जे तेव्हा लहान होते, अशा मतदारांच्या आई, वडील, आजी किंवा आजोबा यांपैकी एकाचे नाव २००२ च्या मतदार यादीत शोधून त्या मतदाराला ‘प्रोजेनी’ (संतती) म्हणून मॅप केले जाते. भविष्यात मतदानासंदर्भातील कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा समस्या टाळण्यासाठी भोकर तालुक्यातील सर्व नागरिकांनी तातडीने आपल्या भागातील बीएलओ यांच्याशी संपर्क साधावा. आपल्या कुटुंबातील सदस्यांची नावे २००२ च्या यादीत शोधून ही मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. मी माझे मॅपिंग पूर्ण केले आहे, याची खात्री करणे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असल्याचे निवडणूक शाखेने कळवले आहे.

आपल्या परिसरातील बीएलओ कोण आहेत, याची माहिती भोकर तहसील कार्यालय किंवा स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयातून मिळू शकते. ही प्रक्रिया पूर्णतः विनामूल्य आहे. भविष्यात कोणतीही अडचण दूर करण्यासाठी शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्व मतदारांनी मॅपिंग करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी भोकर प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार विनोद गुंडमवार तसेच निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भोकर नगर परिषदेच्या कर वसुलीसाठी ‘धडक मोहीम’



**भोकर (प्रतिनिधी)** – शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कर वसुलीसाठी भोकर नगर परिषदेने आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ‘धडक मोहीम’ हाती घेतली आहे. मुख्याधिकारी ऋषभ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या सर्वच विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्यासह ही कारवाई सुरू असून, प्रशासनाने कर वसुलीसाठी पावले उचलली आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार सूचना देऊनही कर भरण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध नगर परिषद प्रशासनाने कठोर कारवाई सुरू केली आहे. या धडक मोहिमेअंतर्गत आजपर्यंत शहरातील विविध भागांतील एकूण २७ नळ कनेक्शन जागीच कापण्यात आले आहेत. पाणीपट्टी थकवणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही, असा स्पष्ट संकेत या कारवाईतून देण्यात आला आहे.

नळ कनेक्शन कापण्यासोबतच मालमत्ता कर थकवणाऱ्या एकूण ३० जणांना प्रशासनाच्या वतीने कडक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या थकबाकीदारांना कर भरण्यासाठी केवळ ३ दिवसांची मुदत देण्यात आली असून, या मुदतीत कराचा भरणा न केल्यास थेट मालमत्ता सील करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. यामुळे शहरातील मोठ्या थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी मुख्याधिकारी ऋषभ पवार यांच्यासोबत इंजि. सुशील खिल्लारे, लेखापाल गुरुनाथ कस्तुरे व सुदर्शन शिंदे, अभियंता श्रद्धा पांचाळ, अनंत कुलकर्णी, गजानन सावरगावकर, रचना सहाय्यक सुशील खाडे, प्रिया बारसे यांच्यासह वसुली पथकात समीरउद्दीन फसीयोद्दीन, रविकुमार महाबळे, ज्ञानेश्वर श्रीरामवार, संतोष सुंकरवार, सचिन वैष्णव, प्राजक्ता हापसकर, साहेबराव मोरे, अशोक डोंगरे, दत्ता अनंतवार, सुरज अरपले, श्रीकांत वडगावकर, विजय हळवे, सुनिल कल्याणकर, कमलाकर भगत, संजय पवार, गोरेमिया मनिमिया या लिपिकांचा समावेश आहे. तसेच शिपाई आणि पंप ऑपरेटर व वॉल्व्हमनची टीम प्रत्यक्ष मैदानात उतरून नळ कनेक्शन तोडण्याचे काम करत आहे.

शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पथदिव्यांच्या सोयी अखंडित राहण्यासाठी कर भरणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शुक्रवारी २७ कनेक्शन कापले असून, ही कारवाई अशीच सुरू राहील. जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी नागरिकांनी तातडीने ३ दिवसांच्या आत आपल्या कराचा भरणा करावा, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा मुख्याधिकारी ऋषभ पवार यांनी दिला आहे.

पालिकेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे थकीत करधारकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पालिकेच्या तिजोरीत महसूल जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

# चंदेरी

## त्रिशा कृष्णन कोट्यवधींच्या संपत्तीची मालकीण!

### एका चित्रपटासाठी घेते 'इतके' कोटी; महिन्याची कमाई ऐकून व्हाल थक्क



त्रिशा कृष्णन दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिनं आतापर्यंत अनेक चित्रपटांत लोकप्रिय अभिनेत्यांसह काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. परंतु, त्रिशा कृष्णन काही दिवसांपासून एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. त्रिशा व दाक्षिणात्य सुपरस्टार विजय थलपती यांच्या अफेअरच्या चर्चा सुरू आहेत. विजयची पत्नी संगीता सोरनालिंगम हिनं घस्टफोटासाठी अर्ज दाखल करतानाच्या वेळेस तिने तिचा पती विजयचे त्रिशाशी विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप केला होता. त्रिशा कायमच तिच्या कामामुळे चर्चेत राहिली आहे आणि तिनं तिच्या सहजसुंदर अभिनयानं प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. तिनं आतापर्यंत अनेक हिट चित्रपटही दिले आहेत. परंतु, तुम्हाला माहीत आहे का तिची वार्षिक कमाई किती आहे आणि ती एका चित्रपटासाठी किती मानधन घेते?

» त्रिशा येत्या काळात विश्वंभरा, करुप्पु आणि इतर काही कलाकृतींमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, त्रिशा सोशल मीडियावरही खूप सक्रिय असते आणि अभिनेत्रीचे तिथेही लाखोमध्ये फॉलोअर्स आहेत.

### त्रिशा कोट्यवधींच्या संपत्तीची मालकीण

चेन्नईमध्ये त्रिशाचं सात कोटींचं आलिशान घर आहे. तिच्या घराचं इंटेरीयर दाक्षिणात्य पद्धतीचं आहे. चेन्नई येथील आलिशान आणि कोट्यवधींची किंमत असलेल्या बंगल्याव्यतिरिक्त तिचा हैदराबाद येथेही सहा कोटींचा आलिशान बंगला आहे. तसेच त्रिशाची संपत्तीही कोट्यवधींमध्ये आहे. त्रिशा तमीळ इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिनं आतापर्यंत अनेक दाक्षिणात्य चित्रपटांत काम केलं आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार ती एका चित्रपटासाटी तीन कोटी इतकं मानधन घेत असल्याचं म्हटलं जातं. ती महिन्याला ७० ते ९० लाखांची कमाई करते. तिची एकूण संपत्ती ८५ ते ९० कोटी इतकी असल्याचं म्हटलं जातं. त्रिशाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर तिनं आतापर्यंत 'घिली', 'आधी नारायण', 'किंग नंबर १', 'खट्टा मिठ्ठा', 'एक सिरफरोश' 'बॉडीगार्ड', 'समर', 'नायकी', 'मोहिनी,' '९६', 'रांगी', 'द रोड', 'लिओ' यांसारख्या चित्रटांत काम केलं आहे. तिनं चित्रपटांतून प्रभास, आर. माधवन, विजय थलपती, अक्षय कुमार, कमल हासन, राणा डगुबट्टी, अल्लू अर्जुन यांसारख्या अभिनेत्यांसह स्क्रीन शेअर केली आहे.

## हंसिकाचा अखेर घटस्फोट!

### पतीकडून कोणतीही पोटगी किंवा आर्थिक मदत घेण्यास दिला नकार



**अभिनेत्री हंसिका मोटवानी आणि उद्योजक सोहेल खातुरिया यांनी लग्नाच्या तीन वर्षांनंतर अधिकृतपणे घटस्फोट घेतला आहे. मुंबईतील वांद्रे फॅमिली कोर्टाने ११ मार्च २०२६ रोजी या जोडीच्या घटस्फोटाला कायदेशीर मंजुरी दिली आहे. दोघांनीही परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला.**

सोहेल व हंसिका यांच्यात लग्नानंतर काही काळातच लाइफस्टाइल आणि वेगळ्या मतांमुळे सवयींमुळे वाद होऊ लागले होते. अगदी छोट्या गोष्टींवरून होणारे मतभेद टोकाला गेल्यामुळे एकत्र राहणं कठीण झालं होतं. कुटुंब आणि मित्रांनी त्यांचं नातं वाचवण्याचा प्रयत्न केला, पण दोघेही घटस्फोट घेण्यावर ठाम होते. या घटस्फोटातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हंसिका मोटवानीने सोहेल खातुरियाकडून कोणतीही पोटगी किंवा आर्थिक मदत घेण्यास नकार दिला आहे. तिला हे नातं सन्मानाने आणि शांततेने संपवायचं होतं, असं तिच्या वकिलांनी स्पष्ट केलं. घटस्फोटानंतर हंसिकाने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली. ज्यात फक्त तीन शब्द लिहिले आहेत. Chardi Kala Always असं तिच्या पोस्टमध्ये लिहिलंय. नेहमी उत्साहात राहणे, परिस्थिती कशीही असो, अगदी कठीण प्रसंगातही आपला उत्साह, आनंद आणि आशा कायम ठेवणे, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवणे आणि कधीही हार न मानणे असे या शब्दाचे अर्थ निघतात. या पोस्टच्या माध्यमातून तिने कठीण काळातही सकारात्मक राहण्याचा संदेश दिला आहे. हंसिका मोटवानी व सोहेल खातुरिया दोघे एकमेकांचे खूप जुने मित्र आणि बिझनेस पार्टनर होते. सोहेलने हंसिकाला आयफेल टॉवरसमोर प्रपोज केलं होतं. त्यांचं लग्न ४ डिसेंबर २०२२ रोजी राजस्थानमधील जयपूर येथील 'मुंडोटा फोर्ट आणि पॅलेस' इथे



अतिशय शाही थाटात झालं होतं. माता की चौकी, मेहंदी, संगीत, हळद आणि सुफी नाईट अशा विविध कार्यक्रमांनंतर दोघे लग्नबंधनात अडकले होते. हंसिका व सोहेलचे लग्न Love Shaadi Drama नावाच्या डॉक्युमेंटरी सीरिजच्या माध्यमातून ओटीटी प्लॅटफॉर्मवर Disney+ Hotstar वर रिलीज करण्यात आले होते. पण, दोघांचं नातं टिकू शकलं नाही. लग्नानंतर तीन वर्षांनी अधिकृतपणे घटस्फोट घेऊन वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे.

### हंसिका मोटवानीची वार्षिक कमाई किती?

हंसिका मोटवानीने आतापर्यंत अनेक दाक्षिणात्य आणि हिंदी चित्रपटांत कामं केली आहेत. तिच्या सौंदर्याने आणि सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. हंसिका एका चित्रपटासाठी किती मानधन घेते आणि तिची एकूण संपत्ती किती आहे? याबद्दल जाणून घेऊयात... हंसिकाची एकूण संपत्ती ३७ कोटी रुपये इतकी आहे. तिच्या कमाईचं मुख्य साधन चित्रपट आहेत. त्यानंतर ब्रँड एंडोर्समेंट आणि विविध व्यवसाय आहेत. अभिनयाव्यतिरिक्त हंसिकाने इतर गोष्टींमध्येही गुंतवणूक केली आहे. ती रिअल इस्टेटमध्येही गुंतवणूक करते. त्यामुळेच तिच्या कमाईचे वेगवेगळे स्त्रोत आहेत. हंसिका चित्रपटांतून मोठ्या प्रमाणात कमाई करते. माध्यमांच्या वृत्तानुसार, ती एका चित्रपटासाठी ८० लाख ते १ कोटी रुपये मानधन आकारते. हंसिकाला खरी ओळख मिळाली ते टीव्ही शो 'शाका लाका बुम बुम'मुळे. यानंतर तिने 'कोई मिल गया' या चित्रपटात काम केलं. त्यानंतर हंसिका काही दाक्षिणात्य चित्रपटांतून झळकायला लागली आणि दाक्षिणात्य इंडस्ट्रीत तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

### महागड्या गाड्यांचं कलेक्शन...



चित्रपटांव्यतिरिक्त हंसिका जाहिराती आणि इतर व्यवसायांमधूनही कमाई करते. ती या सर्व कामांमधून २० ते २५ लाख रुपये कमावते. यासह ती काही व्यावसायिक प्रोजेक्टचाही भाग आहे. हंसिकाला महागड्या गाड्यांचीही खूप आवड आहे. तिच्याकडे अनेक महागड्या गाड्या आहेत. तिच्या गाड्यांच्या कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर तिच्याकडे रोल्स रॉयल्स फँटम आणि मर्सडिज-बेंझ एस-क्लाससारख्या गाड्यांचा समावेश आहे. २०२४ मध्ये तिने बीएमडब्ल्यू ६३० आई जिटी गाडी स्वतःला भेट दिलेली, ज्याची किंमत जवळपास ७५.५० लाख रुपये इतकी आहे. काळानुसार हंसिकाने तिच्या संपत्तीची इतर गोष्टीत गुंतवणूकही केल्याचं म्हटलं जातं.

## शाहरुख खान ठरला जगातील सर्वात श्रीमंत सेलिब्रिटींपैकी एक; कमाई माहितीये का?

**शाहरुख खान बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्याने आतापर्यंत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. तो नेहमी कुठल्या न कुठल्या कारणामुळे चर्चेत असतो. तो बॉलीवूडमधील श्रीमंत सेलिब्रिटींपैकी एक आहे. अशातच आता समोर आलेल्या माहितीनुसार शाहरुख खान बॉलीवूडमधील सर्वात श्रीमंत अभिनेता बनला आहे.**

शाहरुख खान त्याच्या चित्रपटांसाठी कोट्यवधींमध्ये मानधन घेतो; तर त्याच्याकडे कोट्यवधींची मालमत्ताही आहे. 'हरुण ग्लोबल रिच लिस्ट'नुसार शाहरुख खान जगातील सर्वात श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक ठरला आहे. ३०८ अब्जाधीशांसह भारत या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीतील माहितीनुसार शाहरुखची वार्षिक कमाई १०,८०० कोटी इतकी आहे. यामुळे तो जगातील सर्वाधिक श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक ठरतो. यावेळी त्याच्या संपत्तीत किंचित घट झाली आहे. गेल्या वर्षी त्याची संपत्ती तब्बल १२,४९० कोटी रुपये म्हणजेच सुमारे १.४ अब्ज डॉलर इतकी असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. गेल्या वर्षी शाहरुख खानची संपत्ती टेलर स्विफ्ट हिच्यापेक्षाही जास्त होती. २०२५ मध्ये टेलर स्विफ्टची एकूण संपत्ती सुमारे १.३ अब्ज डॉलर इतकी होती. मात्र, यावर्षी टेलर स्विफ्ट ही शाहरुख खानपेक्षा पुढे आहे. शाहरुख खानबरोबर रणबीर कपूर अभिनीत 'रामायण' चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा यांचाही या यादीत समावेश झाला आहे. त्यांनी यावर्षी या यादीत पहिल्यांदाच स्थान मिळवलं असून, त्यांची अंदाजे संपत्ती १ अब्ज डॉलर (सुमारे ९,२०४ कोटी रुपये) इतकी असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, मुकेश अंबानी हे ९.८ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह अजूनही भारतातील सर्वात श्रीमंत उद्योगपती आहेत आणि जागतिक स्तरावर त्यांचा क्रमांक १७ वा आहे, तर गौतम अदानी हे ७.५ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असून जागतिक स्तरावर त्यांचा क्रमांक २३ वा आहे.



## बॉलीवूड सोडून हॉलीवूडमध्ये जाण्याबद्दल प्रियांका म्हणाली...

**प्रियांका चोप्रा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. अभिनयाचा कोणताही वारसा नसताना तिने स्वबळावर इंडस्ट्रीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. परंतु, बॉलीवूडमध्ये अनेक वर्षे काम केल्यानंतर तिने इंडस्ट्री सोडण्याचा निर्णय घेतला आणि हॉलीवूडमध्ये काम करायला सुरुवात केली. अशातच अभिनेत्रीने बॉलीवूडबद्दल वक्तव्य केलं आहे.**

प्रियांकाने २००० साली मिस वर्ल्डचा खिताब जिंकला होता. त्यानंतर तिने तमिळ चित्रपटातून कलासृष्टीत पर्दापण केलं होतं. त्यावेळी ती अवघ्या १८ वर्षांची होती. प्रियांका म्हणाली, की बॉलीवूड आणि हॉलीवूड असे सगळे मिळून मी आतापर्यंत ७० चित्रपटांत काम केलं आहे. भारतात काम करत असताना मला तेच तेच केल्यासारखं वाटत होतं. एकाच पठडीतलं काम केल्यानंतर मला वेगळ्या गोष्टी करून पाहायच्या होत्या. काहीतरी नवीन करण्यासाठी संधीच्या शोधात होते. ती संधी मला हॉलीवूडमध्ये मिळाली, असे ती म्हणाली. आयुष्यात कोणाचाच प्रवास सोपा नसतो, प्रत्येक जण त्याची लढाई लढत असतो, असेही तिने सांगितले.



## विकी कौशलला करायचंय मराठी चित्रपटात काम

'उरी : द सर्जिकल स्ट्राइक', 'सॅम बहादूर', 'जरा हटके जरा बचके', 'सरदार उधम', 'मसान' आणि २०२५ मध्ये आलेल्या 'छावा' या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेला लोकप्रिय बॉलीवूड अभिनेता म्हणजे विकी कौशल. आपल्या दमदार अभिनयाने त्यानं अनेक प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्याच्या 'छावा' चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेचं सर्वच स्तरातून विशेष कौतुक झालं. आजवर बॉलीवूड सिनेमांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या विकीने आता मराठी सिनेमात काम करायचं असल्याच म्हटलं आहे. नुकत्याच एका पुरस्कार सोहळ्यात विकीनं त्याची मराठी सिनेमात काम करायची इच्छा असल्याचं सांगितलं. तसंच त्यानं त्याच्या मराठीतल्या आवडत्या दिग्दर्शकाचं नावसुद्धा सांगितलं. माझी कर्मभूमी आणि जन्मभूमी महाराष्ट्रच असल्याचे विकीने यावेळी सांगितलं. आवडत्या दिग्दर्शकांमध्ये नागराज मंजुळे, अविनाश अरुण या दिग्दर्शकांची नावे विकीने घेतली.

## 'या' चित्रपटांची प्रदर्शनापूर्वी बदलली होती 'नावं'!


**बऱ्याचदा चित्रपट बनवणं जितकं आव्हानात्मक असतं तितकंच त्याचं नाव काय असेल हे ठरवणं कठीण असतं. आतापर्यंत अनेक वेळा काही चित्रपट त्यांच्या नावांमुळे वादाच्या भोवऱ्यात अडकलेले आहेत. याचं एक मोठं उदाहरण म्हणजे संजय लीला भन्साळी यांचा 'पद्मावत' चित्रपट. त्याव्यतिरिक्तसुद्धा बॉलीवूडमध्ये असे अनेक चित्रपट आहेत, ज्यांची नावं रिलीजपूर्वी बदलण्यात आलेली...**

- गोलियों की रासलीला राम-लीला : दीपिका पादुकोण व रणवीर सिंह यांची मुख्य भूमिका असलेल्या गोलियों की रासलीला राम-लीला या चित्रपटाचं नाव चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी बदलण्यात आलं होतं. चित्रपटाचे दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांनी या चित्रपटाचं नाव आधी फक्त 'राम लीला' ठेवलेलं. परंतु, काही धार्मिक संघटनांनी या नावाचा चुकीच्या पद्धतीनं वापर केला जात आहे, अशी तक्रार केल्यानंतर चित्रपटाचं 'राम लीला' हे नाव बदलून 'गोलियों की रासलीला राम-लीला' असं करण्यात आलं.
- बिल्लू : शाहरुख खान व दिवंगत अभिनेता इरफान खान यांच्या या चित्रपटाचं नाव आधी 'बिल्लू बार्बर' असं होतं. परंतु, याही चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेण्यात आल्यानंतर 'बिल्लू बार्बर'वरून फक्त 'बिल्लू', असं चित्रपटाचं नाव ठेवण्यात आलं.
- मद्रास कॅफे : जॉन अब्राहम याच्या या चित्रपटाचं नाव पूर्वी 'जाफना' असं होतं. परंतु, श्रीलंकेतील एका लोकप्रिय शहराचं जाफना हे नाव असल्यामुळे त्या शहराचं नाव खराब होऊ शकतं, असं म्हणत आक्षेप घेतल्यानंतर वाद वाढू नये म्हणून मेकर्सनी चित्रपटाचं नाव बदलून 'मद्रास कॅफे' असं केलं.
- कल हो ना हो : शाहरुख खान, सैफ अली खान व प्रीती झिंटा यांच्या या सुपरहिट चित्रपटाचे नाव आधी कभी अलविदा ना कहना, असं होतं. पण, एका वेगळ्याच कलाकृतीला हे नाव देण्यात आल्यानंतर चित्रपटाचं कभी अलविदा ना कहना हे नाव बदलून 'कल हो ना हो' असं नाव ठेवण्यात आलं.
- वीर-झारा : यशराज चोप्रा यांचा लोकप्रिय 'वीर-झारा' चित्रपटाचं नाव आधी ये कहा आ गये हम, असं असल्याचं म्हटलं जातं. परंतु, नंतर मेकर्सला पात्रांच्या नावावरून चित्रपटाचं नाव ठेवलं, तर ते अधिक प्रभावशाली होईल असं वाटलं आणि म्हणून त्यांनी 'वीर-झारा' असं चित्रपटाचं नाव ठेवलं, ज्याचा सकारात्मक प्रतिसाद त्यांना मिळाला.
- लव यात्री : सलमान खानच्या निर्मिती संस्थेची निर्मिती असलेल्या चित्रपटाचे नाव आधी 'लव रात्री' असं होतं. परंतु, काही हिंदू संघटनांनी नवरात्री या सणाच्या नावाचा चुकीचा वापर होत असल्याचं म्हणत आक्षेप घेतला आणि हे प्रकरण कोर्टापर्यंत पोहोचलं. त्यामुळे चित्रपट अजून जास्त वादाच्या भोवऱ्यात अडकू नये म्हणून मेकर्सनी लव रात्री हे नाव बदलून 'लव यात्री' असं ठेवण्याचा निर्णय घेतला.

## संजय लीला भन्साळी करणार मधुबालाच्या बायोपिकचं दिग्दर्शन?

**९० च्या काळातील लोकप्रिय अभिनेत्री मधुबाला यांच्या जीवनावर आता बॉलीवूडमध्ये चित्रपट बनणार असल्याचं म्हटलं जात आहे. लोकप्रिय दिग्दर्शक संजय लीला भन्साळी या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार असून अभिनेत्री कियारा अडवाणी ही मधुबाला यांच्या भूमिकेत झळकणार असल्याचं म्हटलं जात आहे.**





कियारा अडवाणीने आतापर्यंत अनेक चित्रपटांत विविध भूमिका साकारत इंडस्ट्रीत स्वतःची ओळख निर्माण केली आहे. लवकरच ती दाक्षिणात्य अभिनेता यशची मुख्य भूमिका असलेल्या टॉक्सिक या चित्रपटातून झळकणार होती. परंतु, आता या चित्रपटाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. १९ मार्चला रिलीज होणाऱ्या या चित्रपटाची तारीख बदलून आता हा सिनेमा ४ जूनला रिलीज होणार आहे. अभिनेता यशने इन्स्टाग्रामवर या संदर्भातील पोस्ट शेअर करत जगातील काही देशांमध्ये सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला असल्याचं त्याने या पोस्टमधून म्हटलं आहे. यशबरोबर कियारा यामध्ये मुख्य नायिकेच्या भूमिकेत असून तिच्या व्यतिरिक्त या चित्रपटात तारा सुतारिया, नयनतारा या अभिनेत्रीसुद्धा महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहेत. यश व कियारा यांचा हा चित्रपट हिंदी व इंग्रजीसह दाक्षिणात्य भाषेत प्रदर्शित होणार आहे.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## गीतलेखन आणि बालसाहित्याकडे गांभीर्याने बघितले पाहिजे -कवी दासू वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)** –गीतलेखन किंवा बालसाहित्याकडे खूप नकारात्मक पद्धतीने बघितले जाते. मुळात बालसाहित्य लिहायलाच लोक घाबरतात. त्याचं कारण म्हणजे खूप जणांना असं वाटतं की, आपल्यावर बालसाहित्यिक म्हणून ठप्पा पडेल. त्यामुळे बालसाहित्य दुर्लक्षित राहिलं आहे. जसं प्राथमिक शिक्षण दुर्लक्षित आहे आणि सारे फक्त उच्चशिक्षणाचाच जयघोष करत बसतात आणि आपला पायाच कच्चा असतो. उद्याचे मराठी वाचक कोण आहेत, हा फार गंभीर प्रश्न आहे. आपण जर उत्तम बालसाहित्याची निर्मिती केली नाही, तर उद्याचे चांगले वाचक घडणार नाहीत. म्हणून बालसाहित्याकडे अत्यंत गांभीर्याने बघितलं पाहिजे, असे प्रतिपादन प्रख्यात कवी, गीतकार दासू वैद्य यांनी केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा संकुलाच्या वतीने कौशल्य विकास उपक्रमांतर्गत डॉ. पी. विठ्ठल यांनी त्यांच्याशी हृद्यसंवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. या प्रदीर्घ संवादात दासू वैद्य यांनी स्वत:च्या साहित्यिक जडणघडणीविषयी दिलखुलास भाष्य केले. माझ्या आयुष्यात मुदखेड, अंबाजोगाई आणि नांदेड या गावातील सांस्कृतिक आणि शैक्षणिक पर्यावरणाचा खूप मोठा प्रभाव आहे. तसेच कवी असणं ही गोष्ट मला अधिक प्रिय आहे. सध्या जगात युद्ध सुरु आहे. माणसाला माणूस म्हणून मागे नेणारं हे राजकारण असून सर्वसामान्य माणूस पोटार्थी असतो. त्याच्या जगण्याचे प्रश्न वेगळे असतात, असेही ते म्हणाले.

प्रारंभी भाषा संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी दासू वैद्य यांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. शत्रुघ्न जाधव, डॉ. नीना गोगटे, विनायक येवले यांच्यासह विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्या वादातून प्राणघातक हल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)**– जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवरोड भागात असलेल्या विराट धाबा येथे जवळपास सात जणांनी संगनमत करून एकाला तलवार व खंजरने जबर मारून खून करण्याचा प्रयत्न केला. ही घटना १२ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास घडली.

शहराच्या नमस्कार चौक भागात राहणारा विशाल विजय ढगे (वय २४) याचे आणि आरोपी वैभव कांबळे व त्याच्या अन्य सहकार्यांसोबत जुना वाद होता. या वादातून शिवरोड शिवारात असलेल्या विराट धाबा येथे आरोपी वैभव कांबळे, राहुल भुसारे, योगेश भुसारे, शुभम नायके, आनंद इबितवार इतर दोन अनोळखी यांनी संगनमत करून विशाल ढगे याला शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यात, पायावर तलवार व खंजरने जबर मारहाण केली. यात विशाल ढगे हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## दोन तलाठी महिलांना दोरीने बांधून मारहाण

**माहूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील वाई बाजार देवस्थान शासन ताब्यातील जमिनीतील गहू काढणे सुरू असल्याची पाहणी करण्यासाठी गेलेल्या दोन महिला तलाठ्यांवर हल्ला केला व त्यांना नायलॉन दोरीने बांधून ठेवण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार माहूर तालुक्यातील मच्छिंद्र पारडी येथील सर्वे क्रमांक २ ची शासनाची मारुती देवस्थान नाव असलेली जमीन शासनाच्या ताब्यात आहे. प्रशासनाला गावातील मंडळीकडून गहू पेरणी केल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार तहसीलदारांच्या आदेशावरून मच्छिंद्र पारडी सज्जा लगतच्या पाहणीसाठी दोन महिला कर्मचारी गेल्या होत्या. त्यांच्यासोबत सिंदखेड पोलीस ठाण्याचा एक पोलीस कर्मचारी उपस्थित होता. अंदाजे ५-६ वाजता पथक पोहोचले असता गहू काढणे सुरू होते. यावेळी अश्विनी मुनेश्वर, भीमराव मुनेश्वर, नीलश्री भीमराव मुनेश्वर, भीमराव मुनेश्वर यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर नायलॉनच्या दोरीने बांधून ठेवत थापडबुक्याने मारहाण केली. महिला कर्मचाऱ्यांच्या जवळील मोबाईल काढून घेतले.

दरम्यान महसूल पथक येणार असल्याची माहिती मिळाल्याने नायलॉन दोरी, कोयते यासारखे साहित्य आणून ठेवले होते असे गुन्ह्यात लिहण्यात आले. ही संपूर्ण माहिती मिळताच माहूर तहसीलदार अभिजीत जगताप, सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांना पाहताच आरोपीने अंधाराचा फायदा घेत तेथून पळ काढला. याप्रकरणी मच्छिंद्र पारडी गावात एकच खळबळ उडाली. महिला तलाठी यांच्या फिर्यादीवरून भीमराव मुनेश्वर, अश्विनी मुनेश्वर व निलश्री मुनेश्वर यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतकरी संघटनेचे २० मार्चला बोधडीत रास्ता रोको

**किनवट (प्रतिनिधी)** – मागील ४ महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शेतकरी संघटना पाठपुरावा करीत आहे. परंतु शासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकरी संघटनेच्यावतीने दि. २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता भगवान बाबा चौक बोधडी (बु.) येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे युवा आघाडीचे नांदेड जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांनी दिली आहे.

किनवट तालुक्यात दहा हजार हेक्टरवर मका पिकाची पेरणी झाली असून, पीक काढणीस तयार आहे. अजूनही शासनाने हमीभावाने खरेदीची कोणतीही तयारी केली नसल्यामुळे शेतकऱ्यांना सतराशे रुपये दराने मका विकण्याची वेळ आली आहे. शासनाने मका खरेदी केल्यास शेतकऱ्यांचे ५५ कोटी रुपयांचे नुकसान टळणार आहे. गाव पातळीवर महिला बचत गटाला खरेदीचे अधिकार दिल्यास साडे सहा कोटी रुपयांचा नफा होवून महिला सक्षमीकरण होणार आहे. वरील मागण्यांसह बोधडी व इस्लापूर महावितरण सबस्टेशनचे दहा मेगा वॅट अपग्रेडेशन करून कृषीपंपांचा वीज पुरवठा नियमित करावा, बोधडी, इस्लापूर, हिंगनवाडीसह तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना शेतीमध्ये सिंगल फेज वीज पुरवठा करावा, मौजे बोधडी बु. शिवारात मागील वीस वर्षांपूर्वी वसलेल्या गोकुळवाडी वस्तीला तहसीलदारांनी भेट देऊन पाहाणी करावी, या आदिवासी वस्तीतील नवाटी धारकांचे पट्टे करून द्यावेत, वस्तीत गावठाण व कृषी पंपाचा वीज पुरवठा करावा, रस्ता तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, सीसीआयची कापूस खरेदीची मुदत वाढवावी, स्लॉट बुकिंगच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन पंचनामे करुन शेवटच्या बोंडापर्यंत शासनाने हमीभावाने कापूस विकत घ्यावा या मागण्यांसाठी शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेच्यावतीने रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर भारत राठोड, आत्माराम पाटील, श्रीनिवास जमादार, प्रकाश बाबाराव राठोड, सचिन राठोड, नारायण दराडे, माणिकराव पाटील, राजकुमार हसबे, ओमेश जाधव, बालाजी पाटील जाधव, गोरखनाथ जाधव, मोहन हुन्ना जाधव आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ ला उत्साहात सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी नगर मंडळ, नांदेडच्यावतीने स्काय लाईट लॉर्डस्, स्विमिंग पूल समोर, स्टेशन रोड, शिवाजी नगर, नांदेड येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम् व महाराष्ट्र गीत सादर करून महाअभियान सत्रास प्रारंभ झाला. यावेळी माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांनी प्रस्तावना मांडली. या अभियानांतर्गत खा. अशोकराव चव्हाण, एल. के. कुलकर्णी, माजी मंत्री डी. पी. सावंत, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, चैत्तन्यबापू देशमुख, रामराव केंद्रे, प्रवीण साले, डॉ. सचिन उमरेकर, सौ. शततारका पांढरे, शितल खांडिल, राज यादव व अक्षय अमिलकंठवार यांनी विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. शेवटी राष्ट्रगीत घेऊन महाअभियानाची सांगता करण्यात आली.

अभियान यशस्वी करण्यासाठी सरचिटणीस विजय येवनकर, संदीप सोनकांबळे, मंडळाध्यक्ष अमित वाघ, राजेश काबरा, महेश मुखेडकर, सुयोग कवटगी, प्रथम चौधरी, दीपक मंडले व तौफिक अहमद यांनी परिश्रम घेतले.



या कार्यक्रमास दिलीप कंदकुर्ते, उमेश चव्हाण, दिलीप ठाकूर, सौ. कविता गड्डम, लक्ष्मीकांत गोणे, संतोष मानधने, गिरीश भंडारी, गंगाधर सोनकांबळे, अरविंद ठाकूर, सुषमा थोरात, संदीप लहानकर, प्रतीक चन्नावार, सुशील यादव, दिनेश यादव, प्रथमेश चौधरी, दीपक चौधरी, अर्जुन परदेशी, सोहम देबडवार, साई हातांगळे, करण चव्हाण, विपुल मोळके, प्रेम जुनी, गुरदिप सिंघ, जसबिरसिंघ धुंपिया, पुनम कौर धुपिया, संजीव जिंदल, अॅड रानवळकर, नागनाथ गड्डम, हरजिंदरसिंघ बाठ, जसविंदरसिंघ भाटिया, दलबीरसिंघ चंदन, अब्दुल शाहेद आणि मंडळातील शक्ती केंद्रप्रमुख बुथ प्रमुख आदी उपस्थित होते.

## नांदा सौख्यभरे

### कदम – भोकरे

**नांदेड** – लोहा तालुक्या- तील वाळकी (खु.) येथील रहिवाशी मनोहर व्यंकटराव पाटील कदम यांची कनिष्ठ कन्या आणि कै. व्यंकटराव रामजी पाटील कदम यांची नात चि.सौ.कां. दीपाली यांचा शुभविवाह वसमत तालुक्यातील कोटा येथील रहिवाशी श्री विठ्ठलराव बाबाराव भोकरे पाटील यांचे कनिष्ठ चिरंजीव व कै. बाबराव जयराम भोकरे पाटील यांचे नातू चिरंजीव तुकाराम यांचेसमवेत आज रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:४५ वाजता वाळकी (खु.) ता. लोहा जि. नांदेड येथे संपन्न होत आहे. वधु-वरास हार्दिक शुभेच्छा.

### एडके – कांबळे

**नांदेड**–तरोडा भागातील विजयनगर येथील रहिवाशी उपा. अश्विनी अशोकराव एडके यांचे द्वितीय चिरंजीव आयु. अन्वेश यांचा मंगल परिणय वसमत येथील रहिवाशी उपा. प्रतिभा गंगाधर कांबळे यांची कन्या आयु. विभावरी हिजसमवेत आज रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:३५ वाजता शुभम मंगल कार्यालय, पूर्णा रोड नांदेड येथे संपन्न होत आहे. वधु-वरास हार्दिक शुभेच्छा.

– मुख्य संपादक

## शंकर कुलकर्णी यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**–



पंकजनगर धनेगाव येथील रहिवासी शंकरराव शेषराव कुलकर्णी (वय ५७) यांचे शनिवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सायंकाळी जुनापूल परिसरात तारातीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, भाऊ, भावजय, बहीण असा परिवार आहे.

## राष्ट्रीय लोकअदालतमध्ये १९ दिवाणी प्रकरणे निकाली; २८८ प्रकरणांमधून ६१ लाखांची वसुली

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – न्यायालयीन प्रकरणांचा जलद निपटारा करून नागरिकांना सुलभ न्याय मिळावा या उद्देशाने नायगाव येथील न्यायालयात शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीरीत्या पार पडली. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र के. ब्रम्हे आणि सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. जी. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

तालुका विधी सेवा समिती नायगाव (बा.) यांच्या वतीने आयोजित या लोकअदालतीचे अध्यक्षस्थान दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा समिती अध्यक्षा श्रीमती ए. टी. गित्ते यांनी भूषविले.




लोकअदालतीत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यावर भर देण्यात आला. त्यानुसार प्रलंबित दिवाणी प्रकरणांपैकी तब्बल १९ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली, ज्यामुळे संबंधित पक्षकारांना दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेतून दिलासा मिळाला.

दाखलपूर्व प्रकरणांबाबत मोठ्या प्रमाणावर नोटिसा देऊन संबंधितांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. एकूण २९४० नोटिसा पाठविण्यात आल्या, त्यापैकी २८८ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला. या प्रकरणांतून एकूण ६१ लाख ७७ हजार २९० रुपयांची वसुली करण्यात आली.

## युवकाच्या खूनप्रकरणी तिघांना रोख दंडासह जन्मठेपेची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील आंदेगाववाडी भोज तांडा येथील युवकाच्या खून प्रकरणात मुखेड येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. देशमुख यांनी तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच प्रत्येक आरोपीला १० हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

सेमा गोविंद राठोड यांनी १० ऑक्टोबर २०२२ रोजी मुखेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार त्यांचा मोठा मुलगा विनोद राठोड हा वाडी परिसरात आपल्याच अंगणातील बाजेवर आराम करत असताना आरोपींनी त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात विनोद राठोड गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मुखेड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासानंतर प्रकरण पोलीस उपनिरीक्षक जी. एच. कागणे यांनी न्यायालयात दाखल केले. न्यायालयात एकूण १५ साक्षीदारांची साक्ष व पुरावे तपासण्यात आले.

या प्रकरणाचा निकाल देताना अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी आरोपी धोंडिबा देवला राठोड, पिंटू उर्फ अंकुश बळीराम राठोड आणि काशाबाई धोंडिबा राठोड यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा व प्रत्येकी १० हजार रुपयांचा दंड सुनावला.

राष्ट्रीय लोकशाही अदलातीमध्ये मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत

## ६८० थकबाकी मालमत्ताधारकांनी भरला १ कोटी एक लाख रुपये मालमत्ता कर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास ६८० मालमत्ताधारकांनी जवळपास १ कोटी १ लाख रुपयांचा मालमत्ता कर भरला असून, इतर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सिडको क्षेत्रीय कार्यालयाने अग्रेसर राहुन वसुली केली आहे.

नांदेड वाघाळा शहर मनपाच्या वतीने थकबाकी मालमत्ताधारकांसाठी एक दिवसीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, जिल्हा न्यायालय नांदेड यांच्या वतीने १४ मार्च २६ रोजी नांदेड वाघाळा शहर मनपा मुख्यालय येथे राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. यात अ थकबाकी मालमत्ताधारकांना शास्तीवर ८०/टक्के सुट देण्यात आली होती.



सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास ३७८६ थकबाकी मालमत्ताधारकांना मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपाल संधू, सहाय्यक आयुक्त मनीषा नरसाळे, सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या अधिपत्याखाली कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, वरिष्ठ लिपीक, कर निरीक्षक संजय नागापूरकर, वसंत कल्याणकर, नारायण आठवले, सादुला खॉन, लिपीक मारोती सारंग, मालू एनफळे, प्रकाश दर्शने, रमेश यशवंतकर, उत्तम जोंधळे, राहुल पाईकराव, दीपक जोंधळे, रविंद्र पोवळे यांच्यासह लिपीक हे थकबाकी मालमत्ताधारक व पाणीपट्टी थकबाकी यांना एकूण २१ कोटी ९६ लाख ७६,३१८ रुपये थकबाकीदार असणाऱ्या ३७८६ नोटीसा मालमत्ताधारकांना वाटप केल्या होत्या. त्यापैकी ६८० मालमत्ता- धारकांनी १ कोटी १ लाख मालमत्ता कर भरला आहे. जे थकबाकीदार मालमत्ता कर भरणार नाहीत, त्यांची मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराज स्वसमाधान शिबिरात १५ अधिकाऱ्यांची दांडी

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –महसूल मंडळ रामतीर्थच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्वसमाधान शिबिराच्या पहिल्या टप्प्याचे आयोजन शनिवार, दि. १४ मार्च रोजी रामतीर्थ येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे, नायब तहसीलदार वंदना गवळी, पुरवठा अधिकारी सुषमा मोहड, नायब तहसीलदार परळीकर तसेच सरपंच मनीषा राजेंद्र तोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिबिरात विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

रामतीर्थ महसूल मंडळांतर्गत रामतीर्थ, हिप्परगा माळ, किनाळा, कामरसपल्ली, चिटमोगरा, अटकळी, टाकळी खुर्द, डोणगाव बु., पाचपिंपळी, रामपूर मजरा, केरूर, बिजूर व डोणगाव खुर्द या गावांतील शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिरास उपस्थिती लावली होती. मात्र शिबिरासाठी नियुक्त करण्यात आलेल्या २६ अधिकाऱ्यांपैकी तब्बल १५ अधिकारी गैरहजर राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. शिबीर सुरू झाल्यानंतर अवघ्या वीस मिनिटांत काही कर्मचारी निघून गेल्याचेही निदर्शनास आले. शेवटपर्यंत मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर, तलाठी विजय जाधव, तलाठी दरबारे व तलाठी प्रणिता काळे, संतराम शहाणे, मिलिंद सुपेकर यांच्यासह तलाठी, तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शिवसेनाप्रमुख बाबाराव पाटील रोकडे यांनी शासनाच्या योजनांचा लाभ मिळविताना शेतकरी व सामान्य नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असल्याची खंत व्यक्त केली. विहीर, गोठा, घरकुल व वीज बील यांसारख्या कामांसाठी होणारी अडचण कमी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

### गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देणार -तहसीलदार



दरम्यान, किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने यांनी घरकुलाबाबत गटविकास अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यावरून वाद निर्माण झाल्याचे सांगण्यात आले. काही विभागांचे अधिकारी माहिती असूनही अनुपस्थित राहिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

यावेळी तहसीलदार गजानन शिंदे यांनी शिबिराला गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमास लक्ष्मण देगलूर, शेषराव रोकडे, हणमंतराव पाटील तोडे, बालाजी सुगावे, सरपंच तिरुपती डाकोरे, सरपंच आकाश कोकणे, शिवाजी खिसे, मुरलीधर देगलुरे, भगवान रोकडे, परिसरातील पोलीस पाटील, सरपंच यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com